# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

YEAR : 38) 15th February 2013 (No. of Pages 16 ) ( No : 03

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

***( MFUCTO )***

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजी मुंबई येथील बैठकीत सम्मत झालेला ठराव

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळासोबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५.२.२०१३ रोजी सायंकाळी ६.०० वाजता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या वर्षा निवासस्थानी आयोजित करण्यात आलेली बैठक रात्री ठिक १०.०० वाजता सह्याद्री अतिथिगृहावर सुरू झाली. या बैठकीला मा. मुख्यमंत्र्याशिवाय मा. उपमुख्यमंत्री, मा. शिक्षण मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) अप्पर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, वित्त व इतर अधिकारी उपस्थित होते. बैठक रात्री ११.३० वाजेपर्यंत चालली.

**२.** ही चर्चा होत असतांना ८० टक्क्यांची थकबाकी २ किंवा ३ हप्त्यामध्ये देण्याची तरतुद केंद्र शासनाच्या १४ ऑगस्ट, २०१२ च्या शासननिर्णयामध्ये आहे ही गोष्ट संघटनेतर्फे मांडली जात असतांना मा. उच्च शिक्षण सचिव श्री. जे.एस. सहारीया हे वारंवार "**ही सर्व थकबाकी राज्य शासनाने पूर्णपणे एकमुस्त एकरकमी अदा करावयाची आहे तरच केंद्रशासनाकडून परतावा मिळेल.**" अशी माहिती मा. मुख्यमंत्र्यांना व मा. उपमुख्यमंत्र्यांना वारंवार देत होते. ही माहिती देतांना १४ ऑगस्ट, २०१२ च्या केंद्र शासनाच्या निर्णयाच्या संदर्भात १४ नोव्हेंबर, २०१२ च्या केंद्र शासनाच्या पत्रात ज्या सुचना आहेत त्यातील "Full arrears have been paid to the teachers" या वाक्याचा वारंवार चुकीचा अर्थ ते सांगत होते. "Undertaking by the State Government" हे जे राज्य शासनाच्या वतीने भरून द्यावयाचे आहे ते भरून देतांना सर्व थकबाकी दिली असेल, तर प्रतिज्ञापत्रात "to the effect that full arrears have been paid to teachers" असे शब्द वापरावे व थकबाकी दोन किंवा तिन हप्त्यात दिली असेल तर "in case arrears have not been paid to teachers in full as yet, the factual position may be indicated with regard to actual release, and if arrears are being paid in installments an undertaking to that effect may be furnished immediately with relevant details" असे शब्द वापरावे असे १४ नोव्हेंबर २०१२ च्या केंद्राच्या उक्त पत्रात (No.F-1-2/2012-U.II Government of India Ministry of Human Resource Development Department of Higher Education Room No. 402/C, Shastri Bhavan, New Delhi, 14th November, 2012) नमुद आहे.

**३.** वस्तुतः मुळ १४ ऑगस्ट, २०१२ च्या शासननिर्णयात तसे नाही. प्रतिज्ञापत्राच्या मुसद्यात सुद्धा तसे कुठेही नाही ही गोष्ट शिष्टमंडळाच्या वतीने वारंवार लक्षात आणून दिल्यावर सुद्धा उच्च शिक्षण सचिव आपली मांडणी सोडायला तयार नव्हते. याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, "in case arrears have not been paid to teachers in full as yet, the factual position may be indicated with regard to actual release, and if arrears are being paid in installments an undertaking to that effect may be furnished immediately with relevant details" असेही उक्त पत्राच्या परिच्छेद ४ मध्ये नमुद आहे पण तो पुढचा परिच्छेद ४ मधील भाग उच्च शिक्षण सचिव वाचत नव्हते. फक्त अगोदरचाच परिच्छेद ३ मधिल भाग वारंवार वाचून दाखवित होते.

**४.** "**थकबाकी अदा करतांना पालन करावयाच्या अटींबाबतची कृती**" आणि "**प्रत्यक्ष केलेली कृती याबाबत केंद्रशासनाकडे पाठवावयाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये करावयाचे सत्यकथन**" या दोन मधील फरक मा. उच्च शिक्षण सचिवांना कळू नये हे महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्राचे फार मोठे दुर्दैव होय. "**एकमुस्त सर्व थकबाकी एक रकमी अदा करावयाची व मग दोन किंवा तीन हप्त्यामध्ये केंद्र शासनाकडून परतावा मिळेल**" हे एक वाक्य आणि "**दोन हप्त्यामध्ये थकबाकी अदा करावयाची व मग दोन किंवा तीन हप्त्यामध्ये केंद्र शासनाकडून परतावा मिळेल**" हे दुसरे वाक्य. या दोन वाक्यांमधील फरक मा. उच्च शिक्षण सचिवांना कळत नव्हता यावर हे कार्यकारी मंडळ विश्वास ठेवू शकत नाही. ते त्यांना खरेच कळत नव्हते की त्यांनी आखलेल्या योजनेचा तो एक भाग होता हे आमच्या शिष्टमंडळाला कळण्याचे कारण नव्हते. पण मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. उच्च शिक्षणमंत्री व राज्यमंत्री यांच्या समक्ष चर्चेमध्ये ते ठामपणे असा उल्लेख करित होते की, "**ही सारी थकबाकी एकमुस्त अदा करावी लागेल तरच केंद्रशासनाकडून परतावा मिळेल. अशा केंद्राच्या सूचना आहेत. मात्र परतावा मिळतांना तो २ किंवा ३ हप्त्यामध्ये मिळेल.**" त्यांचे हे वाक्य बोलून झाल्याबरोबर वित्त विभागाच्या त्यांच्या एका सहकारी अधिकाऱ्यांने "**हे परताव्याचे २-३ हप्ते किती मुदतीचे असतील याचा कोठेही उल्लेख नाही हा कालखंड २-३ वर्षाचा असू शकतो किंवा ३० वर्षाचा सुद्धा असू शकतो.**" असे काढलेले उद्गार ऐकून शिष्टमंडळाला आश्चर्य वाटले. त्यामुळे त्यापाठोपाठ मा. मुख्यमंत्र्यांनी "**सारी थकबाकी एकमुस्त दिली तरच केंद्राकडून परतावा मिळेल हे स्पष्ट दिसते. केंद्र सरकारची आर्थिक परिस्थिती ही काही फार चांगली नाही त्यामुळे त्यांच्याकडून वेळेवर परताव्याचा निधी मिळेल असे सांगता येत नाही**"

***या राज्यात विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकांना जे अधिकार आहेत ते राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना नाहीत यावर महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी विश्वास ठेवावा अशी अपेक्षा करणे चुक आहे.***

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ३० पहा)*

**असे उद्‌गार काढल्याचे ऐकून शिष्टमंडळ आणखीच आश्चर्यचकीत झाले.** नेटसेट मुक्त शिक्षकांबाबतसुद्धा थोडीशी चर्चा झाली. आता बराच वेळ झालेला आहे. नेट-सेट मुक्त शिक्षकांबाबतचे तुमचे म्हणणे मला ऐकून घ्यायचे आहे. उद्या दुपारी ३ वाजता आपण पुन्हा बसू असे मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले व ५ फेब्रुवारी रोजीची चर्चा संपली. त्यानंतर संघटनेच्या कार्यालयामध्ये रात्री उशिरापर्यंत कार्यकारी मंडळाची बैठक होवून काही महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

**५.** “**८० टक्क्यांची ही सर्व थकबाकी एकरकमी राज्यशासनाने द्यावी व मगच केंद्र शासन परतावा देईल**” हा मा. उच्च शिक्षण सचिवांनी, मा. मुख्यमंत्र्यांच्या व मा. उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत लावलेला अर्थ राज्यशासनाने मान्य करावा व “**ही ८० टक्क्यांची थकबाकी पुढील एक महिन्यात एकमुस्त अदा करावी**” अशी मागणी करणारा ठराव त्याच दिवशी रात्री झालेल्या बैठकीत महासंघाच्या कार्यकारी मंडळाने सम्मत केला व त्याचबरोबर दोन हप्त्यामध्ये थकबाकी अदा करण्याचा संघटनेतर्फे करण्यात आलेला उल्लेख मागे घेण्यात यावा असेही ठरले. ते मुख्यत्वे पुढील कारणांसाठी :-

(१) महाराष्ट्राचे मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांच्यासह मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेशजी टोपे यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत जे निर्णय झाले त्या बैठकीच्या इतिवृत्तात पहिलाच परिच्छेद पुढील प्रमाणे आहे.

“केंद्र शासनाने पाठविलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन सुधारणा विषयीची समग्र योजना राज्य शासनाने विचारात घेऊन **त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक १२.८.२००९ रोजी निर्गमित केला.** या योजनेची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळावे असे उद्दीष्ट राहील. हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून **न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल.**” या आश्वासनाची आजपावेतो कोणतीही अम्मलबजावणी करण्यात आलेली नाही.

(२) आता केंद्र शासनाने दिनांक १४ ऑगस्ट, २०१२ रोजी शासन निर्णय (No. F.1-7/2010-U.II) काढून सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना (नेट सेट मुक्त शिक्षक धरुन) १ जानेवारी, २००६ पासून ३१ मार्च २०१० पर्यंत नवीन वेतनश्रेणीच्या थकबाकी पोटी येणाऱ्या रकमेच्या ८० टक्के रक्कम अंशदान म्हणून महाराष्ट्र शासनाला देऊ केली असतांना शिक्षकांविषयी उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीच्या मनात असलेल्या आकसपूर्ण भावनेमुळे अजूनही याबाबतची अम्मलबजावणी झालेली नाही. “**केंद्र शासनाने दिले नाही तर आम्ही देवू**” या आश्वासनाला मागे टाकून “**केंद्राने दिले तरी आम्ही देणार नाही**” या कृतीतून हा आकस ठसठशितपणे दिसून येतो व त्यातूनच मा.उच्च शिक्षण सचिव चूकीची माहीती देत होते.

(३) ८० टक्के थकबाकी केंद्र शासनाकडून मिळण्याची आता खात्री झालेली असतांना एकमुस्त थकबाकी अदा करण्यात कोणतीही अडचण असता कामा नये.

(४) दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी अशी थकबाकी केंद्राने अदा केलेली असल्याने आज याबाबत केंद्रशासनावर राज्यशासनाने गैरभरवसा करण्याचे कोणतेही कारण नाही.

(५) एवीतेवी एक रुपयाचे अनुदान मिळत नसतांना १७ लाख कर्मचारी, शिक्षक व सेवानिवृत्त प्राध्यापकांना ८० टक्के थकबाकी आतापर्यंत अदा करण्यात आलेली असताना व येथे ८० टक्के अनुदान केंद्र शासन देत असतांना, कार्यरत मा. कुलगुरु, प्रकुलगुरू, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांनी सातत्त्याने अवमानित होण्याचे कोणतेही कारण नाही. **केंद्र शासनाचे ८० टक्के अनुदान मिळत आहे हा जणू काही विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा गुन्हा आहे असे समजून या सर्व बाबतीत होत असलेले नोकरशाहीचे वर्तन अत्यंत आक्षेपार्ह व संतापजनक म्हणावे लागेल.**

**६.** दुसऱ्या दिवशी बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजी दुपारी ३ वाजता ठरल्याप्रमाणे संघटनेचे ,शिष्टमंडळ सह्याद्री अतिथीगृहावर उपस्थित राहीले. त्याचवेळी तेथे मंत्रिमंडळाची बैठक क्रमांक १ च्या सभादालनात होती असे कळले. मा. मुख्यमंत्री ५ वाजता येणार आहेत. बैठक होणार आहे असे सांगून शिष्टमंडळाला क्रमांक दोनच्या दालनात बसविण्यात आले. पाच साडेपाच वाजताच्या सुमारास मा. मुख्यमंत्री आल्यावर थेट मंत्रिमंडळाच्या बैठकीत गेलेत. पाच दहा मिनिटांनी मा. उच्च शिक्षणमंत्री श्री. राजेशजी टोपे क्रमांक २ च्या दालनांत आले व त्यांनी महासंघाच्या शिष्टमंडळाशी चर्चा सुरु केली. ही चर्चा १०-१५ मिनिटातच आटोपली. ती चर्चा नव्हतीच तर राज्यशासनाचा काय निर्णय आहे तो सांगण्यासाठी ते आले होते. थकबाकी अदा करण्याच्या बाबतीत ते आम्हाला तोंडीच काय ते सांगत होते. त्यांच्याजवळ तयार निवेदन किंवा टिपण काहीही नव्हते. ते जे सांगत होते त्याचा महासंघाच्या शिष्टमंडळाला जो अर्थ समजला तो असा की “**दहा रुपयाच्या थकबाकीचा पहिला हप्ता आम्ही देवू, त्याचा परतावा केंद्र शासनाने आम्हाला अदा केला की मग त्यानंतरचा दहा रुपयाचा दुसरा हप्ता अदा करु, मग त्याचा परतावा मिळाला की थकबाकीचा शेवटचा व तिसरा हप्ता अदा करु. अशा रितीने तीन हप्त्यामध्ये थकबाकी अदा करु.**” मा. उच्च शिक्षणमंत्री हे शिष्टमंडळाला सांगत असताना मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री हे सुद्धा उभ्या उभ्या दोन चार मिनीटासाठी सभेत येवून गेलेत. ते आलेत तेव्हा मा. उच्च शिक्षण मंत्र्यांचे तोंडी सांगणे सुरु होते व ते पूरे झाले नव्हते. मा. उच्च शिक्षण मंत्र्यांचे सारे सांगून झाल्यावर **आपण जो काही तोंडी निर्णय सांगितला आहे त्यावर आम्ही कार्यकारी मंडळात विचार करुन निर्णय घेवू व आपणास कळवू असे शिष्टमंडळातर्फे सांगण्यात आले व ही चर्चा १०-१५ मिनीटातच संपली.**

**७.** दिनांक ६ फेब्रुवारी रोजी सह्याद्रीवरील चर्चा संपल्यानंतर संघटनेच्या कार्यालयामध्ये महासंघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक सुरू झाली व ती रात्री बऱ्याच उशीरापर्यंत चालली व सर्व स्थितीचा आढावा घेवून निर्णय घेण्यात आले. **तीन हप्त्यात थकबाकी देण्याचा व प्रत्येक टप्प्यावर केंद्राकडून परतावा मिळाल्यावरच पुढचा हप्ता देण्याचे जे कटकारस्थान नोकरशाहीने रचले आहे त्यामधील सर्व धोक्यांची तपशीलवार चर्चा करण्यात आली.**

**८.** प्रत्येक परताव्याच्या वेळी राज्यशासनातील नोकरशाही व केंद्रशासनातील नोकरशहा जो खेळ मांडतील त्याचा आढावा घेण्यात आला. धडधडीत मा. मुख्यमंत्र्यांच्या व मा. उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत केंद्राच्या पत्राचा अत्यंत चुकीचा अर्थ सांगणाऱ्या नोकरशाहीकडून या तीन हप्त्यापैकी प्रत्येक हप्ता अदा करतांना होवू शकणाऱ्या संभाव्य हप्तेबंदीची नुसती कल्पना करणे सुद्धा कल्पनेपलीकडचे आहे. चुकीचा अर्थ लावून सर्व कुलगुरुंना, प्रकुलगुरूंना, शिक्षकांना आपल्या भोवती फिरवत ठेवणे व त्यातून उद्‌भवणारा संभाव्य भ्रष्टाचार हा अंगावर शहारे आणणारा असेल असे कार्यकारी मंडळाला वाटते. दुसरी आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे थकबाकी बाबत केंद्र व राज्यशासनामध्ये ८०:२० टक्केचा फॉर्म्युला हा गेले अनेक वर्षापासून अस्तित्वात आहे. संभाव्य भ्रष्टाचाराला रान मोकळे करून देण्याऱ्या अशा पद्धतीने ही थकबाकी महाराष्ट्रात यापूर्वी कधीही अदा करण्यात आली नाही. **याबाबतचा महाराष्ट्राचा इतिहास बदलविण्याची नोकरशाहीची इच्छा पूर्ण करण्याचे कोणतेही कारण नाही व केंद्राची व्यवस्था अशी मुंबईत बसून बदलविण्याचा व एक नवी आपल्या सोईची वहीवाट पाडण्याचा या नोकरशाहीचा अधिकार हे कार्यकारी मंडळ मान्य करु शकत नाही.**

**९.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळासोबत दिनांक २३

***विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्रातील १९९१ ते २००० या कालखंडात नियुक्त झालेल्या नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत जो निर्णय घेतला त्या निर्णयाने प्रभावित होणाऱ्या नेटसेटमुक्त शिक्षकांचे महाराष्ट्र शासनाच्या धोरणामुळे महाराष्ट्रात आता सरळसरळ दोन भाग पडलेले आहेत.***

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ३१ पहा)*

एप्रिल १९७७ रोजी पहिली बैठक, ४ जून १९७७ रोजी दुसरी बैठक व २२ ऑगस्ट १९७७ रोजी तिसरी बैठक. अशा तीन बैठका त्यावेळी आयोजित करण्यात आल्या होत्या. **महाराष्टाचे ज्येष्ठ नेते व तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील हे या प्रत्येक बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. प्रत्येक बैठक काही तास चालली होती.** सर्व विद्यापीठांचे कुलगुरू बैठकीला उपस्थित होते. प्रत्येक प्रश्नाबाबत संघटनेचे म्हणणे ऐकून घेऊन पूर्ण चर्चा करून मा. मुख्यमंत्री निर्णय देत असत. या तीनही बैठकीचे कार्यवृत्त सविस्तर नोंद करून **"मतैक्य पत्र एक, दोन व तीन"** अशा स्वरुपात सचिवांच्या स्वाक्षरीने मा. मुख्यमंत्र्यांनी हे तीन दस्तऐवज संघटनेच्या सुपूर्द केले होते. या कागदपत्रांच्या प्रति आजही संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. थकबाकी अदा करण्याबाबत २५ ऑक्टोबर १९७७ रोजी निर्गमित झालेल्या शासननिर्णयाच्या परिच्छेद XIII(4) मध्ये **शासननिर्णय निघण्यापूर्वीची सर्व थकबाकी एकमुस्त द्यावी, मात्र त्यातून "यापूर्वी दिलेला ७५० रुपयाचा ॲडव्हाक ॲडव्हान्स" कापून घ्यावा.** अशी स्पष्ट तरतूद होती. ती पुढील शब्दात :-

"The ad hoc advance of Rs. 750 sanctioned and paid to each eligible College/University teacher ; vide government Resolution, Education and youth Services Department. No. USG-1177/132329-XXXII (Cell), dated 27th September, 1977 should be deducted from the total arrears before making payment."

**१०.** मा. मुख्यमंत्र्यांनी ठरवून दिलेल्या पद्धतीने दिनांक २५ ऑक्टोबर १९७७ रोजी जो शासननिर्णय निघाला त्याच्या परिच्छेद XIII(5) मध्ये "The additional expenditure on pay proper on account of revision of scales of pay of teachers in University, Government and non Government Colleges as on 1st January, 1973 to 31st March, 1979 between the Government of India and the State Government in the ratio of 80 : 20 " असा स्पष्ट उल्लेख असून १९७७ चा शासननिर्णय निघाल्यानंतर सुद्धा केंद्राचे अनुदान येतच राहणार असल्यामुळे त्यावेळच्या उच्च शिक्षण संचालकांवर त्याबाबतची जबाबदारी सोपविण्यात आली होती. प्रथम वेतन अदा करून नंतर परतावा मिळविण्याची ती व्यवस्था या शासननिर्णयाच्या त्याच परिच्छेदात पुढील शब्दात नमूद केली आहे. :-

"5. **Procedure to be adopted by the director of Education** (Higher Edun.) The Director of Education (Higher Education) Should send a quarterly statement to the Accountant General, Maharashtra I, Bombay and the Accountant General, Maharashtra II, Nagpur and claim the grant from the Government of India before the close of every financial year. The Accountant General, Maharashtra I, Bombay, Should be requested to credit the Government of India's share under receipt Head 160, Grant-in-aid from Central Government Education."

आजच्या स्वभावाची नोकरशाही त्या काळच्या प्राध्यापकांना लाभली असती तर "पहिल्या महिन्याच्या थकबाकीचा परतावा केंद्राने दिल्यानंतरच पुढच्या महिन्यात केंद्राचा भाग अदा केला जाईल" अशी तरतूद करण्यात आली असती.

**११. चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी** महाराष्ट्राचे जेष्ठ नेते व तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. शरदराव पवार यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी प्रत्येक मुद्यावर सह्याद्री अतिथीगृहावर तपशीलवार चर्चा करून एक सहमतीपत्र तयार करविले होते व ते संघटनेच्या सुपूर्द केले होते. (आजही हा दस्तऐवज संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध आहे.) "AGREEMENT REACHED IN THE DISCUSSIONS OF THE REPRESENTATIVES OF THE MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO) WITH THE CHIEF MINISTER OF MAHARASHTRA." असा या दस्तऐवजाचा मथळा असून त्यात सुरुवातीलाच असे नमूद आहे की, "Protracted talks were held between the chief Minister and the representatives of the MFUCTO on 28th December, 1988 and on 11th, 13th, 14th, 17th and 18th January, 1989. The copy of the **agreement** reached by the Government of Maharashtra and the MFUCTO is enclosed." त्यावेळी थकबाकी अदा करण्याबाबत उभयपक्षी संमत झालेला मजकूर या ॲग्रीमेंटच्या परिच्छेद ६ मध्ये नमूद असून तो पुढील प्रमाणे आहे. :-

"(6) 50% arrears on account of implementation of revised scales of pay from 1.1.1986 will be given to the teachers in cash and the remaining 50% will be deposited in the G.P.F. Accounts of the respective teachers, to be blocked for a period of three years except in cases of retirement/ death/resignation." थकबाकी अदा करतांना प्रत्येक हप्त्याच्या वेळी मुंबई व दिल्लीत लोकांना चकरा मारायला लावण्याची कल्पना सुद्धा त्यावेळच्या नोकरशाहीला सुचलेली नव्हती.

**१२. पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी,** आजचे विधानसभाध्यक्ष व तत्कालीन मा. उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीपराव वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची जी चर्चा झाली त्या चर्चेचे कार्यवृत्त "Discussions of the representatives of the Maharashtra Federation of University and College Teachers' Organisations (MFUCTO) with the Hon. Minister for Higher & Technical Education on behalf of the Government held on 7.12.99" या दस्तऐवजामध्ये नमूद असून त्यात थकबाकी अदा करण्याबाबत अत्यंत पारदर्शक असा पुढील प्रमाणे उल्लेख आहे. "Payment of arrears on account of D.A. and other allowances will be regulated as per Govt. Orders applicable to State Govt. employees."

**१३.** सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी सेवानिवृत्ती वयाची अट शासनाला मान्य नसल्याने व शेवटच्या क्षणी मतैक्यपत्र तयार व्हावे या सदहेतूपोटी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने निवृत्ती वयाच्या अटीचा आग्रह न धरण्याचे ठरविल्याने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी एका बाजूला व दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांच्यासह मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेशजी टोपे यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत थकबाकी संदर्भात जे निर्णय झालेत, ते त्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या

***विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एकाच निर्णयाखाली असलेल्या या नेटसेट मुक्त शिक्षकांचे दोन भाग करुन त्यांना वेगवेगळी वागणूक देणे हे भारतीय घटनेच्या कलम १४ चा सरळसरळ भंग करणारे कृत्य आहे. कायद्यापुढे समानतेचा जो हक्क त्या कलमाने बहाल केलेला आहे त्यात असे नमुद आहे की,***

**"The State shall not deny to any person equality before the law or the equal protection of laws"**

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ३२ पहा)*

## "केंद्र शासनाने दिले नाही तर आम्ही देवू" या आश्वासनाला मागे टाकून "केंद्राने दिले तरी आम्ही देणार नाही" हा आकस

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ५.२ पहा)*

पहिल्याच परिच्छेदात नमूद आहेत. ते पुढील प्रमाणे .:-

"केंद्र शासनाने पाठविलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन सुधारणा विषयीची समग्र योजना राज्य शासनाने विचारात घेऊन त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक १२.८.२००९ रोजी निर्गमित केला. या योजनेची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळावे असे उद्दिष्ट राहील. हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल."

कोणाला आवडो अथवा न आवडो थकबाकी अदा करण्याची सहमतीने ठरलेली ही व्यवस्था संपूर्णपणे पारदर्शक होती व तिकडून पहिल्या हप्त्याचा परतावा आल्यावर मगच दुसरा हप्ता देवू या प्रकाराला तेथे कोणताही वाव नव्हता. पहिल्याच दिवशी खुद्द मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांच्या समक्ष केंद्राच्या पत्राचा चुकीचा अर्थ सांगून पुढे येवू घातलेल्या संकटापासून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाला सावध केल्याबद्दल **मा. उच्च शिक्षण सचिव श्री. जे.एस.सहारिया यांच्याप्रती हे कार्यकारी मंडळ धन्यवाद भावना व्यक्त करीत असून थकबाकी अदा करण्याबाबत अत्यंत पारदर्शक व्यवस्था असणाऱ्या आतापर्यंतच्या साऱ्या व्यवस्था मोडीत काढून संभाव्य भ्रष्टाचाराचे उगमस्थान ठरू शकणाऱ्या नव्या व्यवस्थेला ठामपणे फेटाळून लावण्यात येत आहे. केंद्र शासनावर गैरभरवसा करणाऱ्या थकबाकी अदा करण्याच्या कोणत्याही व्यवस्थेवर भरवसा ठेवण्यास दृढ नकार देण्याचा निर्धार हे कार्यकारी मंडळ व्यक्त करीत आहे.**

**१४.** ज्या भावनेने महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे शिष्टमंडळ चर्चेसाठी गेले होते, त्या भावनेचा पहिल्याच बैठकीत आदर होवू शकला नाही याचे या कार्यकारी मंडळाला तीव्र दुःख होत आहे व त्यामुळेच आता आणखी काही बाबी या संदर्भात मांडणे आवश्यक झाले आहे. "१४ ऑगस्ट २०१२ चे केंद्र शासनाचे थकबाकी अदा करण्याबाबतचे आदेश निर्गमित झाल्यानंतर सर्व थकबाकी एकमुस्त शिक्षकांना अदा केली पाहिजे व त्यानंतर राज्य शासनाने २-३ भागात केंद्राकडून त्याचा परतावा घेतला पाहिजे" ही भारतामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाने आता स्थापित केलेली व्यवस्था आहे. त्याचे तपशील पुढीलप्रमाणे :-

**१५.** उत्तरप्रदेश विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघाचे समन्वयक डॉ. हृदयनाथ त्रिपाठी विरुद्ध उत्तर प्रदेश शासन या प्रकरणात (No. 64068 of 2011) हा निर्णय झालेला आहे. २१ ऑगस्ट २०११ रोजी एक परिपत्रक काढून उत्तर प्रदेश शासनाने **"केंद्राकडून निधी आल्यावर आम्ही थकबाकी देवू"** असे आदेश काढले होते. **उत्तर प्रदेश शासनाचा हा आदेश मा. उच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविला व एकमुस्त थकबाकी देण्याचे आदेशित केले.**

**१६.** थकबाकी एकमुस्त अदा करण्याची अर्जदाराची मागणी फेटाळून लावण्याचे उत्तर प्रदेश शासनाच्या वकिलाने समर्थन केले होते. त्याचा उल्लेख मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयातच असून तो पुढील प्रमाणे :-

"Supporting the action of the State Government, learned Standing Counsel submits that for payment of arrears from 1.1.2006 to 30.11.2008, the State Government adopted the scheme of revised pay-scale, *inter alia,* on the assurance that 80% of the expenses to be incurred in the implementation of the scheme would be borne by the Central Government. ...... **Furthermore, vide impugned order dated 21.8.2011, it has been explained that after receipt of assistance from the Central Government, arrears will be paid.**"

**१७.** केंद्र शासनाच्या वकिलांनी १४ ऑगस्ट २०१२ च्या परिपत्रकासंबधी केंद्र शासनाची भूमिका मा. उच्च न्यायालयासमोर मांडली. त्याचाही उल्लेख मा. उच्च न्यायालयाच्या निकालपत्रात आहे. तो पुढील शब्दातः-

"It is also not in dispute that the State Government had accepted the terms and conditions of the Scheme and as such, we are of the view that once the scheme has been accepted by the State Government, it is the bounden duty of the State to act thereupon. **In the instant case, on perusal of the letter dated 14.8.2012, which has been produced before us during the course of arguments by the learned Counsel for the Union of India,** it transpires that the Central Government has made it clear that reimbursement of 80% of Central share of the additionality of payment of arrears for the period from 1.1.2006 to 31.3.2010 would be made by the Central Government in 2-3 installments by way of reimbursement **only after the State Government had made the payment but the State Government has not paid the entire amount of revised pay-scale to the eligible teachers** on the pretext that after receiving 80% share from the Central Government, the revised pay-scale would be paid to the eligible teachers, **which vitiates the dictum of the scheme so formulated for paying revised pay-scale in pursuant to the VI Pay Commission's** Report."

**१८.** अर्जदाराचे, केंद्र शासनाचे व राज्यशासनाचे म्हणणे ऐकून घेतल्यावर मा. उच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे निर्णय दिला :-

"In view of the aforesaid facts, we are of the view that the **stand taken by the State Government in the impugned order is wholly erroneous and cannot be sustained.** The proper course available to the State Government is first to pay the amount pursuant to the recommendations of the UGC, which admittedly has been accepted by the State Government and thereafter shall apply to the Cen-

## केंद्र शासनाचे ८० टक्के अनुदान मिळत आहे हा जणू काही विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा गुन्हा आहे असे समजून या सर्व बाबतीत होत असलेले नोकरशाहीचे वर्तन अत्यंत आक्षेपार्ह व संतापजनक म्हणावे लागेल.

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ५.५ पहा)*

tral Government for reimbursement of the amount so incurred towards the payment of arrears of salary. **For the reasons aforesaid, the impugned order dated 21.8.2011 is liable to be quashed.**

**Accordingly, impugned order dated 21.8.2011 is hereby quashed.** The State Government is directed to release the necessary fund for payment of arrears of salary of teachers of National Post Graduate College, Barhalganj, Gorakhpur within a maximum period of one month, from the date of receipt of certified copy of this order."

**१९.** नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिनांक ५ फेब्रुवारी २०१३ रोजी सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या बैठकीत जी थोडीशी चर्चा झाली त्याचे तपशिल नमुद करणे आवश्यक आहे. संघटनेचे अध्यक्ष नेटसेट बाबत राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळला गेला पाहिजे असे सांगत होते. हे सांगतांना मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दि. २.५.२०१२ रोजी एमफुक्टो या शिक्षकसंघटनेसमवेत झालेल्या बैठकीच्या शासकीय कार्यवृत्तातील भाग ते वाचून दाखवित होते. या बैठकीच्या कार्यवृत्तातील "दि. १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल २००० या कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकाच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १६/०८/२०११, २६/०८/२०११ व दि १५/०३/२०१२ च्या पत्रान्वये दिलेले निदेश विचारात घेवुन सदर अध्यापकांच्या सेवा नियुक्तीच्या दिनांकापासुन सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचे निदेश दिले आहेत." हा भाग त्यांनी वाचून दाखविला व नंतरचा भाग ते वाचायला लागले. तो पुढील प्रमाणे :- **"या संदर्भात मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांची विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली.** सदर चर्चेमध्ये डॉ. वेदप्रकाश यांनी, आयोगाने दिलेली सुट हि संबंधित विद्यापीठानी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन देण्यात आल्याचे नमुद करुन अशा प्रकारे विद्यापीठांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियमीत नेमणुक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासुन सेवा नियमीत करुन सदर सेवा नियमीतीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतलेला असल्याचा आयोगाच्या दि. १५/०३/२०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला."

**२०.** कार्यवृत्ताचा उपरोक्त भाग संघटनेचे अध्यक्ष वाचत असतांना या लहानशा सभेत बराच गोंधळ मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांच्या समक्ष होत होता. खुद्द मा. उच्च शिक्षणमंत्री या गोंधळाचे नेतृत्व करीत होते. ते अध्यक्षांना सतत असे सांगत होते की, "अहो! ते कशाला वाचता. ते कशाला वाचता. त्यांच्या पुढचे वाचा. वगैरे" पण त्या गोंधळातही अध्यक्षांनी पुढचे **"सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले."** हे वाक्य वाचून दाखविले व त्यापुढचे **"याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्या नंतर उक्त अध्यापकांना दिनांक ११/१२/१९९९ व दि. १२/०८/२००९ रोजी च्या शासननिर्णयातील तरतुदी विचारात घेवुन त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात यावी."** या कार्यवृत्तातील वाक्यांचे वाचन पूर्ण केले.

**२१.** एक गोष्ट जाहिरपणे नमुद केली पाहिजे, ती अशी की हा सर्व गोंधळ शांतपणे पाहत असलेले मा. मुख्यमंत्री ठाम आवाजात म्हणाले **"मी मुख्यमंत्री या नात्याने जो शब्द दिलेला आहे तो मी निश्चित पाळीन पण त्यासाठी मला काही वेळ लागेल. मला मंत्रिमंडळासमोर जावे लागेल"** त्यावर अध्यक्षांनी ते सुद्धा आपण ठरवून दिलेले आहे, असे सांगितले व मा. मुख्यमंत्र्यांच्या संघटनेशी झालेल्या चर्चेच्या कार्यवृत्तातील जो भाग वाचून दाखविला तो पुढील प्रमाणे :- **"वरील प्रमाणे स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती केल्यानंतर लाभार्थींना देय होणाऱ्या थकबाकी संबंधीत मंत्रीमंडळास्तरावर निर्णय घेण्यात येईल."** पण मा. मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त प्रमाणे निर्णय सांगितल्यामुळे त्यावर पुढे काही चर्चा होवू शकली नाही.

**२२.** मा. मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त उद्‍गार काढले व या विषयावरील चर्चा थांबविली, ते पहाता त्यांना याबाबतच्या अनेक गोष्टी माहित नाहीत असे या कार्यकारी मंडळाचे ठाम मत झालेले आहे. सर्व बाबींचा उल्लेख या ठरावामध्ये करणे शक्य नसले तरी काही प्रमुख बाबी लक्षात आणून देणे आवश्यक वाटते.

**२३.** मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेच्या पदाधिकाऱ्यासोबत झालेल्या चर्चेत काय ठरले होते हे प्रथम नमुद करणे आवश्यक आहे. शासकीय कार्यवृत्तातील याबाबतचा भाग पुढील प्रमाणे :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाचे जे निदेश आहेत ते वाचून झाल्यावर **"सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले."** असे कार्यवृत्तात नमुद आहे.

(२) "उपरोक्त कालावधीतील अध्यापकांच्या सेवा आयोगाकडुन वरील प्रमाणे सहमती प्राप्त होण्याच्या अधिन **सर्व प्रयोजनार्थ नियमित नियुक्तीच्या दिनांकापासुन ग्राह्य धरण्याचे ठरले."** असेही या कार्यवृत्तात नमुद आहे.

(३) **"याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्या नंतर उक्त अध्यापकांना दिनांक ११/१२/१९९९ व दि. १२/०८/२००९ रोजीच्या शासननिर्णयातील तरतुदी विचारात घेवुन त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात यावी."** असाही स्पष्ट उल्लेख या कार्यवृत्तात आहे व पुढे

(४) थकबाकीबाबत "वरील प्रमाणे स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती केल्यानंतर **लाभार्थींना देय होणाऱ्या थकबाकी संबंधीत मंत्रीमंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल."** असे नमुद करण्यात आले आहे.

**२४.** मंत्रिमंडळाच्या स्तरावर कोणता निर्णय घेण्यात येईल हे मा. मुख्यमंत्र्यांच्या निर्णयात स्पष्टपणे "वरील प्रमाणे स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती केल्यानंतर **लाभार्थींना देय होणाऱ्या थकबाकी संबंधी मंत्रीमंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल."** या शब्दात नमुद आहे. आता स्थाननिश्चिती व वेतननिश्चितीच झालेली नसेल तर थकबाकी संदर्भात मंत्रीमंडळ स्तरावर निर्णय कसा होणार?

**२५.** या कार्यकारी मंडळाने ही गोष्ट वारंवार विविध निवेदनांच्याद्वारे शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे की स्थाननिश्चिती व वेतननिश्चितीसाठी वेगळ्या शासननिर्णयाची आवश्यकता नाही (इतक्या उपर शासनाला आणखी एखादा शासननिर्णय काढायचा असेल तर त्याला संघटनेची ना असण्याचे कारण नाही) याबाबतच्या तरतुदी ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयात उपलब्ध आहेत.

(१) सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयामुळेच विद्यापीठ अनुदान आयोगाने आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी सेवा केंव्हापासून धरावी याबाबत गेल्या अनेक वर्षापासून ठाम भूमिका घेतली आहे. विधीसल्लागारांच्या सल्ल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २५ डिसेंबर १९९८ रोजी एक परिपत्रक काढले होते. (UGC letter D.O. No.F.2-6/98 (PS) dated 25th December 1998) त्यात पुढील प्रमाणे तरतुद आहे. :-

"The commission after seeking legal opinion on clause 1 (e) has decided to include service rendered in adhoc capacity for counting of past service for placement in senior scale/ selection grade, provided that three conditions, as mentioned hereunder are fulfiled.

(a) The adhoc service was of more than one year duration;

(b) The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee; and

(c) The incumbent was Selected to the permanent post

**तीन हप्त्यात थकबाकी देण्याचा व प्रत्येक टप्प्यावर केंद्राकडून परतावा मिळाल्यावरच पुढचा हप्ता देण्याचे जे कटकारस्थान नोकरशाहीने रचले आहे त्यामधील सर्व धोक्यांची तपशीलवार चर्चा करण्यात आली.**

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ७ पहा)*

in continuation to the adhoc service without any break."

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने सन १९९८ मध्ये स्थाननिश्चितीसाठी सेवा कोणती धरण्यात यावी याबाबत जी अधिसूचना काढली होती त्या आधारावर राज्य शासनाने दिनांक ६ मार्च १९९९ रोजी "**अधिव्याख्याता (वरिष्ठ श्रेणी/ निवड श्रेणी) पदावर स्थाननिश्चिती करण्यासाठी ग्राह्य धरावयाची सेवा.**" या मथळ्याचा एक शासननिर्णय (क्रमांक युएसजी १२९८/३४०२६/(४७१२)/ विशि-४) काढला. त्याच्या परिच्छेद २ मध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे तरतुद आहे

"वरील सूचनांतील सूचना क्र. ८.६.० मधील एक वर्षापेक्षा जास्त काळ केलेली तदर्थ सेवा खालील परंतुकानुसार वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी स्थान निश्चिती करताना परिगणीत करता येईल असे कळविले आहे.

अ) तदर्थ सेवा ही एक वर्षापेक्षा जास्त कालावधीची होती.

ब) उमेदवारांची अधिव्याख्याता पदावरील नियुक्ती विहित केलेल्या निवडसमितीच्या शिफारसीनुसार करण्यांत आली होती.

क) उमेदवारांची तदर्थ सेवेला जोडून त्यात कोणताही खंड न पडता स्थायी पदावर नियुक्ती झाली होती."

१९९१ ते २००० या काळातील हे सर्व शिक्षक शासनाने सुरुवातीला 'तदर्थ' म्हणून नामीत केले पण मुळात ते स्थायी पदावर सेवेत कन्फर्म झालेले शिक्षक आहेत. **विद्यापीठ अनुदान आयोगाने नेटसेट मुक्तता दिलेल्या प्रत्येक शिक्षकाची सुरुवातीपासून सेवा धरण्याची तरतुद या शासननिर्णयाप्रमाणे आहे व तो शासननिर्णय आजही जिवंत आहे.**

(३) आता जुन २०१० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनमध्ये (Notified under No.F.3-1/2009 dated 30th June 2010) सुद्धा अशीच तरतुद आहे ती पुढील शब्दात :-

"10.0 COUNTING OF PAST SERVICES FOR DIRECT RECRUITMENT AND PROMOTION UNDER CAS:

"10.1 (f) The adhoc or temporary service of more than 1 year duration can be counted provided that

(i) The period of service was of more than one year duration

(ii) The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee and

(iii) The incumbent was selected to the permanent post in continuation to the adhoc or temporary service without any break "

मा. सर्वोच्च न्यायालयाने " Sharadendu Bhushan, Appellant v. Nagpur University, Nagpur & Ors, Respondents" (AIR 1988, Supreme Court 335) या प्रकरणात "experience is the basis of placement." असा जो निर्णय दिला होता त्यावर आधारित ही उपरोक्त व्यवस्था आहे.

(४) जुन २०१० चे विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपरोक्त नोटीफिकेशन आल्यावर "**विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ३० जून २०१० च्या अधिसूचनेन्वये शिक्षक व समकक्ष पदांवरील नियुक्त्या सदर पदाचे किमान शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेण्या, अनुषंगिक लाभ, प्रोत्साहनपर वेतनवाढी इत्यादी बाबीं संदर्भात निर्गमित केलेले आदेश राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना लागू करणेबाबत.**" या मथळ्याचा एक तपशीलवार शासननिर्णय (शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/(२५/११)विशि-१ : मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. दिनांक : १५ फेब्रुवारी, २०११) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केला. उपरोक्त नोटीफिकेशन संदर्भात महाराष्ट्र शासनाचे २३ आदेश उक्त शासननिर्णयाच्या परिच्छेद ३ मध्ये नमुद आहेत. त्यातील क्रमांक १६ वर शासनाचा पुढील आदेश नमुद आहे. :-

"१६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेतील परिच्छेद क्र. १०.० : **शासन आदेश :- या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १०.० ते १०.१ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत.**"

**२६.** अस्तित्वात असलेल्या उपरोक्त तीन शासननिर्णयाच्या (११ डिसेंबर १९९९, ६ मार्च १९९९ व १५ फेब्रुवारी २०११) आधारे नेटसेट नसलेल्या १९९१ ते २००० या काळात नेमणूका झालेल्या शेकडो नेटसेट मुक्त शिक्षकांची (एम्.फील पीएचडी नसलेल्या) सेवा नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून धरून ११.१२.१९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात आली व त्याप्रमाणे त्यांना आज प्रत्यक्षात वेतन मिळत आहे. **अशा शिक्षकांची संख्या महाराष्ट्रात दोन ते तीन हजार आहे.**

**२७.** नियमाप्रमाणे सहसंचालकांनी कारवाई केली असली तरी ती करतांना आपल्याला विचारले नाही म्हणून मंत्रालयातील काही अधिकाऱ्यांना राग आला व त्यांनी "ते रद्द करा" असे तोंडी आदेश दिले. पुण्याच्या सहसंचालकांनी तसे लेखी आदेश पारित केले. डझनावरी शिक्षकांना न्यायालयात जावे लागले. "IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY CIVIL APPELLATE JURISDICTION : WRIT PETITION NO.1893 OF 2010" दिनांक ३ सप्टेंबर २०१० रोजी मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणात निर्णय दिला. त्या निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये असे नमुद आहे की :- "It is also common ground that their pay was fixed in the senior scale and the selection grade earlier. **They were also paid in the senior scale and the selection grade as per the Government Resolution dated 11th December, 1999.** It is also an admitted position that now by the orders which are impugned in these petitions, the **Joint Director, Higher Education has cancelled the order made by him earlier** fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade. " या शिक्षकांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती रद्द करणारे सहसंचालकांचे आदेश मा. उच्च न्यायालयाने पुढील शब्दात रद्द ठरविले. :-

**"The orders impugned in the petitions, whereby the orders made earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade have**

**संभाव्य भ्रष्टाचाराला रान मोकळे करून देण्याच्या अशा पद्धतीने ही थकबाकी महाराष्ट्रात यापूर्वी कधीही अदा करण्यात आली नाही.**

**याबाबतचा महाराष्ट्राचा इतिहास बदलविण्याची नोकरशाहीची इच्छा पूर्ण करण्याचे कोणतेही कारण नाही**

**केंद्राची व्यवस्था अशी मुंबईत बसून बदलविण्याचा व एक नवी आपल्या सोईची वहीवाट पाडण्याचा नोकरशाहीचा अधिकार मान्य होवू शकत नाही.**

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ८ पहा)*

**been cancelled, are set aside**"

२८. पुणे विभागासारखाच प्रकार औरंगाबाद विभागातसुद्धा घडला. शेकडो शिक्षकांना न्यायालयात जावे लागले व डझनावरी प्रकरणे मा. उच्च न्यायालयासमोर दाखल झालीत. व मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठासमोर "IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO. 1991 OF 2011" या प्रकरणामध्ये मा. औरंगाबाद खंडपिठाने दिनाक २८ मार्च २०११ रोजी निर्णय दिला व सहसंचालकांचे स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती रद्द करणारे आदेश रद्द केले. **पुढे अशा अनेक प्रकरणात एकामागून एक न्यायालयातून निर्णय झालेत काही विभागाच्या सहसंचालकांनी सुज्ञपणा दाखविल्याने त्या भागात प्रकरणे उद्‌भवली नाहीत.**

२९. सन १९९१ ते २००० या काळातील महाराष्ट्रातील सर्व नेटसेट मुक्त शिक्षक हे आता विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ८ जुलै २०११ च्या ४७९ व्या बैठकीत विषय क्रमांक २.०९ अन्वये घेतलेल्या एकाच निर्णयाखाली आलेले आहेत. हा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने निरनिराळ्या चार पत्रांनी महाराष्ट्र शासनाला कळविला आहे. त्यातील पहिले पत्र १६ऑगस्ट २०११ रोजीचे, दुसरे पत्र २६ ऑगस्ट २०११ रोजीचे, तिसरे पत्र १५ मार्च २०१२ रोजीचे व चौथे पत्र हे दिनांक ११ मे २०१२ रोजीचे आहे.

३०. उपरोक्त ४ पत्रान्वये एक सारखा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्य शासनाला कळविला. १९९१ च्या रेग्युलेशनबाबत सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर लिगल ओपिनियन घेवून वेळोवेळी विद्यापीठ अनुदान आयोगाने काढलेल्या परिपत्रकांशी सुसंगत असा हा विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय आहे. आता प्रश्न असा आहे की १९९१ ते २००० या काळातील ज्या शेकडो शिक्षकांच्या बाबतीत एकाच प्रकारचा जो निर्णय उपरोक्त प्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतला त्यापैकी २ ते ३ हजार शिक्षकांना पहिल्या दिवसापासून त्यांची सेवा धरुन स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती दिली गेली व गेल्या अनेक महिन्यापासून त्यांना ती मिळत आहे. **अशा स्थितीत या राज्यात विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकांना जे अधिकार आहेत ते राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांना नाहीत यावर महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी विश्वास ठेवावा अशी अपेक्षा करणे चुक आहे.**

३१. विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्रातील १९९१ ते २००० या कालखंडात नियुक्त झालेल्या नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत जो निर्णय घेतला त्या निर्णयाने प्रभावित होणाऱ्या नेटसेटमुक्त शिक्षकांचे **महाराष्ट्र शासनाच्या धोरणामुळे महाराष्ट्रात आता सरळसरळ दोन भाग पडलेले आहेत.** त्यातील एका फार मोठ्या भागाला (जवळ जवळ निम्मे शिक्षकांना) प्रचलित शासननिर्णयानुसार स्थाननिश्चिती व वेतन निश्चितीचे लाभ सहसंचालकांनी अदा केले असून गेल्या अनेक महिन्यापासून त्यांना ते मिळत आहेत. याच शिक्षकांमधील जवळ जवळ निम्म्या शिक्षकांचा दुसरा भाग आज महाराष्ट्रात अस्तित्वात असून ज्यांच्याबाबतीत मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी व मा. मुख्यमंत्र्यांनी हे लाभ त्यांना देण्याचे वारंवार मान्य करुन सुद्धा त्यांना त्या लाभांपासून वंचित ठेवण्यात आले आहे व अजूनही त्याबाबत निर्णय होत नाही.

३२. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या एकाच निर्णयाखाली असलेल्या या नेटसेट मुक्त शिक्षकांचे दोन भाग करुन त्यांना वेगवेगळी वागणूक देणे हे भारतीय घटनेच्या कलम १४ चा सरळसरळ भंग करणारे कृत्य आहे. कायद्यापुढे समानतेचा जो हक्क त्या कलमाने बहाल केलेला आहे त्यात असे नमुद आहे की, "The State shall not deny to any person equality before the law or the equal protection of laws" या कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या हक्कामुळे "Among equals the law should be equal and should be equally administered and that like should be treated alike" हा समानतेचा हक्क नागरिकांना घटनेने प्रदान केलेला आहे. **अतएव या शिक्षकांना दोन भागात विभागून त्यांना वेगवेगळी वागणूक देण्याचे नोकरशाहीचे हे कारस्थान सपशेल घटनाविरोधी असून ते सहन करण्यास ठाम नकार देण्याचा निर्धार हे कार्यकारी मंडळ व्यक्त करीत आहे.**

३३. नोकरशाहीने पहिल्या दिवसापासून सेवा धरुन लाभ देतो म्हटले तर त्यांना कोणत्याही नव्या शासन आदेशाची किंवा मंत्रिमंडळाच्या निर्णयाची गरज नसते. मात्र मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी किंवा मा. मुख्यमंत्र्यांनी तसाच लाभ देतो म्हटले की अनेक प्रकारचे अडथळे नोकरशाहीकडून उभे केले जातात हे एका बाजूला जेवढे खरे आहे तेवढेच हेही खरे की वित्त विभागाची मान्यता होऊन, मंत्रिमंडळाची मान्यता मिळून, शासननिर्णय निघाल्यावरसुद्धा ते लाभ शिक्षकांच्या पदरात पडू न देण्यामध्ये उच्च शिक्षण विभागातील नोकरशाही अत्यंत वाकबगार आहे. याची अनेक उदाहरणे उपलब्ध असली तरी एक ठळक उदाहरण नमुना म्हणून नमुद करणे या कार्यकारी मंडळाला आवश्यक वाटते.

३४. शासनाचे आदेश असुनसुद्धा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना बोलाविणे, त्यांच्याशी चर्चा करणे, प्रस्तावित मसुदा त्यांना दाखविणे, आपल्या मसुद्यात काही चुका असतील तर त्याबाबतचे म्हणणे ऐकून घेणे, संघटनेचे पदाधिकारी दाखवितात त्या चुका खरोखरच आपल्या मसुद्यात असतील तर त्याप्रमाणे आपला मसुदा दुरुस्त करणे, **परिणामी बिनचूक असा शासननिर्णय बाहेर पडणे ही प्रक्रियाच आता उच्च शिक्षण विभागात बंद पडलेली आहे.** शिवाय आम्ही करतो ते शंभर टक्के बरोबर आहे हा उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा अहंकार पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची जुनी प्रथा चालू ठेवली तर दुखाविला जातो. अशा या अहंकाराच्या पोटीच १९ एप्रिल २०१२ च्या शासननिर्णयाचा जन्म झाला. मंत्रिमंडळाच्या व वित्तविभागाच्या सम्मतीने शासननिर्णय सन २००९ मध्येच निर्गमित झालेला आहे. याची आठवण सुद्धा न रहाण्याचा हास्यास्पद प्रकार त्या शासननिर्णयात अंतर्भूत आहे.

३५. सन २००९ मध्ये "Revision of pay Scales of teachers and equivalent cadres in Higher Education as per UGC Scheme (6th Pay commission) Universities, Affiliated Colleges, Government Colleges/ Institutes of Science etc." या मथळ्याचा व "GOVERNMENT OF MAHARASHTRA Higher & Technical Education Department, Resolution No. NGC 2009/(243/09)-UNI-1, Mantralaya Annex, Mumbai 400 032. Date: 12th August 2009" या क्रमांकाचा व दिनांकाचा शासननिर्णय निर्गमित झाला आहे. (यापुढे २००९ चा शासननिर्णय असा उल्लेख) या शासननिर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये "This Government Resolution is according to the decision taken by the **State Government** on the scheme forwarded by Government of India by its letter dated 31.12.2008." असा स्पष्ट उल्लेख आहे. त्याच शासननिर्णयाच्या परिच्छेद १४ मध्ये असाही उल्लेख आहे की, "**These orders issue with the concurrence of the Finance Department vide their unofficial reference No.395/ SER.9, dated 10-08-2009**" याचा सरळ अर्थ असा आहे की, हा शासननिर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर निर्गमित झाला तरीही ते लाभ दोन अडीच वर्षे नोकरशाहीने अडवून ठेवले. त्याची अम्मलबजावणी का झाली नाही? ही कुंभकर्णी झोप घेणारे अधिकारी आंदोलन सुरु झाल्यानंतरच चार महिन्यानी का जागे होतात? हे त्यांना कुणीच विचारु

***थकबाकी अदा करण्याबाबत अत्यंत पारदर्शक व्यवस्था असणाऱ्या आतापर्यंतच्या साऱ्या व्यवस्था मोडीत काढून संभाव्य भ्रष्टाचाराचे उगमस्थान ठरू शकणाऱ्या नव्या व्यवस्थेला ठामपणे फेटाळून लावण्यात येत आहे.***

***केंद्र शासनावर गैरभरवसा करणाऱ्या थकबाकी अदा करण्याच्या कोणत्याही व्यवस्थेवर भरवसा ठेवण्यास दृढ नकार***

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद १३ पहा)*

शकत नाही. ही स्थिती निश्चितच भूषणावह नाही.

**३६.** सन २००९ च्या शासननिर्णयाप्रमाणे एप्रिल २००९ ते जानेवारी २०१० अशी १० महिन्याची थकबाकी रोखीने देण्याबाबतचे आदेश ३२ महिन्यापूर्वी निर्गमित झालेले असतांना आंदोलन सुरु झाल्यानंतर चार महिन्यांनी उच्च शिक्षण विभागातील अहंकारी अधिकाऱ्यांनी १९ एप्रिल २०१२ ला नवा शासननिर्णय काढला. वित्त विभागाच्या सहमतीने व मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित झालेला २००९ चा शासननिर्णय जिवंत असतांना, तो रद्द झालेला नसतांना किंवा दुरुस्त झालेला नसतांना १ एप्रिल २००९ ते ३१ जानेवारी २०१० या कालखंडासाठी त्या शासननिर्णयात "**(ii) Pay in the revised pay structure is payable in cash from 1st day of April 2009.**" अशी तरतुद असतांना पुन्हा मंत्रिमंडळाची मान्यता व पुन्हा अकारणच नवा शासननिर्णय काढण्याचा अधोरी प्रकार उच्च शिक्षण विभागाने केल्याचा इतिहास ताजा आहे.

**३७.** अनेक प्रकरणामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यावेळी सुट दिली होती. पण शासनस्तरावर कोणतीही कारवाई होत नव्हती. त्यातून प्रकरण न्यायालयात गेले. "IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY NAGPUR BENCH : NAGPUR WRIT PETITION NO.4909 OF 2010" या प्रकरणात दिनांक २० एप्रिल २०११ रोजी मा. उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यामध्ये महाराष्ट्र शासनाची काय भूमिका होती हे दिसून येते. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयातील तो भाग पुढील प्रमाणे :-

"It is apparent that though the University Grants Commission vide notification dated 5/11/2008 exempted Lecturers from clearing NET/SET examination, however, **only because the date from which such exemption would come into effect was not communicated/declared by the University Grants Commission, the claims of the petitioners for grant of senior grade pay scale as per Career Advancement Scheme could not be finalized by the State Government.** The State Government is ready

**No. F. 1-7/2010-U.Il**

# Government of India
# Ministry of Human Resource Development
## Department of Higher Education New Delhi,
## dated 14th August, 2012

To
All State Education Secretaries in charge of Higher Education

**Subject:**-Scheme of Revision of pay of teachers and equivalent cadres in universities and colleges following revision of pay scales of Central Government employees on the recommendations of the Sixth Central Pay Commission - **reimbursement of arrears- regarding.**

**Reference:-** (i) MHRD's letter No. 1-32/2006-U.II(I) dated 31.12.2008.

(ii) MHRD's letter No. 1-7/2010-U.Il dated 11.05.2010.

Sir,

As you are aware, this Ministry had revised the pay scales of university and college teachers vide this Ministry's letter No. 1-32/2006-U.II/U.I (i) dated 31.12.2008. University Grants Commission has **also notified the UGC Pay Regulations, 2010 in this regard.**

2. Although this Scheme was essentially for teachers in Central Universities, provisions of the Scheme could be made applicable by State Governments to State Universities and Colleges coming under the purview of the State Government, provided the State Governments adopt and implement the scheme as a composite scheme, including the enhanced age of superannuation and the regulations laid down by the UGC in this regard. The age of superannuation for teachers in Central Universities had been enhanced to 65 years vide this Ministry's letter No. 1-19/2006-U.II dated 23.03.2007, for those involved in class room teaching.

3. **Central Government had decided to provide financial assistance, for the period 1.1.2006 to 31.3.2010, to the extent of 80% as reimbursement to those State Governments,** which may opt for these revised pay scales. The State Governments were to provide 20% of the arrears from its own resources. The assistance was subject to the condition that the entire pay revision package, together with all conditions laid down in this regard by the UGC by way of regulations and including enhancing the age of superannuation of teachers, would be implemented as a composite scheme by the State Governments without any modification except to the date of implementation (on or after 1.1.2006) and any higher scales of pay which the State Governments may decide after taking into consideration local conditions into consideration. However, **the Central assistance would be limited to the scales of pay as approved by the Central Government under the Scheme.**

4. After taking into consideration the views expressed by several State Education Ministers during the Conference held in 2010 the Central Government has now decided to de-link the condition of enhancement of age of superannuation from the payment of Central share of 80% arrears to the States.

5. Bearing in mind that the question of enhancement of age of retirement is exclusively within the domain of the policy making power of the State Governments, the issue of age of retirement has been left to the State Governments to decide at their level. **The condition of enhancement of age of superannuation to 65 years as mentioned in this Ministry's letter dated 31.12.2008 may be treated as withdrawn, for the purpose of seeking reimbursement of central share of arrears to be paid to State University and College teachers.** However, the others conditions as mentioned in the letters cited above shall continue to apply.

6. **State Governments may please note that reimbursement of 80% of central share of the additionality of payment of arrears, for the period from 1.1.2006 to 31.3.2010, will be made by the Central Government in 2-3 installments.** However, this would be by way of reimbursement only, after the State Government has made the payment. In this connection, this Ministry letter of even No. dated 11.05.2010 also refers {copy enclosed).

7. It has been decided to seek the additional information from the State Governments in order to process release of central share of arrears. **State Governments are requested to provide the requisite information in the enclosed proforma.**

*8.* You are requested to kindly take further necessary action in this regard as detailed above and furnish the requisite information to this Department urgently **to enable us to process release of central share accordingly.**

9. Kindly acknowledge receipt of this letter.

Yours faithfull-y,
**(Rajender Kalwani)**
Under Secretary to the Government of India

**Encl: As above**

Copy for information to:- **(1)** Chief Secretaries of all States **(2)** The Secretary1 University Grants Commission, BSZ Marg, New Delhi **(3)** PS to HRM **(4)** PS to MOS(DP)/PS to MOS(EA) **(5)** Cabinet Secretariat with reference to communication No.23/CM/ 2012(i) dated 23rd July, 2012. **(6)** PSO to Education Secretary **(7)** JS(HE)/FA/DDG/JS(Pianning) **(8)** Shri Krishan Kumar, Director, PMO, South Block, New Delhi. **(9)** PAO/IFD/IF-1/P&M $. CMIS Unit for placing it on the website of the Ministry.

and willing to consider the claims of the petitioners for grant of benefits under Career Advancement Scheme provided University Grants Commission communicates the date from which exemption granted vide notification dated 5/11/2008 becomes effective. It is also brought to the notice of this Court that the State Government has already made a request to the University Grants Commission in this regard."

**३८.** मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयात विद्यापीठ अनुदान आयोगाला पूर्व परिच्छेदात नमुद केलेले आदेश दिल्यानंतर त्याच निर्णयात राज्यशासनाला मा. उच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे आदेश दिलेले आहेत . :-

"In the above background, **We direct the respondent no.5 University Grants Commission to communicate to the State Government the date when such exemption became effective as per notification dated 5/11/2008 in respect of the petitioners, within a period of three weeks** from the date of communication of this order. **We direct the State Government to reconsider the claims of the petitioners on receipt of communication from the University Grants Commission in respect of effective date of exemption, in accordance with law and procedure applicable in this regard at the earliest.** With these observations and directions, the petition is disposed of."

एका बाजूला राज्य शासनाने तारिख कळवा अशी विनंतीच विद्यापीठ अनुदान आयोगाला केली होती. आता तर मा. उच्च न्यायालयाने तसा आदेशच दिला. त्या आदेशाप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाने तातडीने निर्णय घेतला व तो राज्यशासनाला कळविला. पण राज्य शासनाने त्यावर काहिही कृति केली नाही.

**३९.** मा. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात "At the earliest" म्हणजे लवकरात लवकर निर्णय घ्यावा असे म्हटले हे खरे पण या गोष्टीला जवळ जवळ दोन वर्षाचा काळ झाला तरी शासनाचा निर्णय होत नाही याबद्दल उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये तीव्र असंतोष आहे. याशिवाय राज्य शासनाने अनेक वेळा याबाबत उच्च शिक्षण क्षेत्राला मुदतबंद आश्वासने दिली आहेत. ती पुढील प्रमाणे :-

**४०.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी व मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांची मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेशजी टोपे यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तातील परिच्छेद ५ पुढील प्रमाणे आहे. :-

"विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतूदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, **नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील**" विद्यापीठ अनुदान आयोगाने आपला अंतिम निर्णय राज्य शासनाला कळवून दहा महिने

*Most Immediate by Fax/Speed Post*

**No.F-1-2/2012-U.II**

# GOVERNMENT OF INDIA

## Ministry of Human Resource Development : Department of Higher Education

**Room No. 402/C, Shastri Bhavan, : New Delhi, 14th November, 2012**

To,

The Education Secretary of all State Governments,

**Subject** : Financial assistance to the State Governments after Revision of pay of teachers in Universities and Colleges following the Revision of pay Scales of Government Employees on the recommendation of 6th pay Commission.

Sir,

As you are aware, the Central Government has delinked the condition relating to enhancement of age of superannuation to 65 years of teachers in University & Colleges under the purview of the State Government from payment of central share of 80% of additionality of arrears on account of revision of salary for the period for 1.1.2006 to 31.03.2010. In this regard, this Ministry's letter No. 1-7/2010-U.II dated 14th August, 2012 refers. It is clarified that no allowances or pension is reimbursable under the package.

2. It was also decided that reimbursement of 80% of central share of the additionality of payment of arrears, for the period from 1.1.2006 to 31.3.2010, **will be made by the Central Government in 2-3 installments.** However, this would be by way of reimbursement only, after the State Government has made the payment.

3. Accordingly, it is requested that all State Government may please **furnish undertaking,** as per proforma enclosed, duly signed by an officer not below the rank of Deputy Secretary to the State Govt. **to the effect that full arrears have been paid to teachers** and equivalent cadres for 1.1.2006 to 31.03.2010, also indicating the amount & dates on which the arrears were disbursed to various categories.

**4. In case arrears have not been paid to teachers in full as yet, the factual position may be indicated with regard to actual release, and if arrears are being paid in installments, an under-taking to that effect may be furnished immediately with relevant dates to enable us to process the case for release of central share.**

5. The requisite information may please be sent immediately to this Ministry by 23rd November, 2012 positively.

Yours faithfully
(Rajender Kalwani)
Under Secretary to the Govt. of India

Enci : As above — Telfax 23387934

** AF : P 03 **

UNDERTAKING BY THE STATE GOVERNMENT

I, Shri/Smt./Km ................................................ (Designation)* in the (name of Department) Government of ....................................................................... duly ......................... authorized ................... by ............................................................................... (Name & Designation of Competent Authority) do hereby commit and undertake on behalf of the Government of .......................... that an amount of Rs. ..................... has been released to teachers of State Universities and Colleges as payment of arrears on account of revision of salary on implementation of the UGC Revised Pay Scales Scheme for the period from 1.1.2006 to 31.3.2010

Signature

Date — Seal

* Deputy Secretary or Officer of equivalent position in the State Government.

**"The stand taken by the State Government in the impugned order is wholly erroneous and cannot be sustained. The proper course available to the State Government is first to pay the amount pursuant to the recommendations of the UGC,**

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद १८ पहा)*

झाले तरी येथे निर्णय कां होत नाही हे जाणून घेण्याचा उच्च शिक्षण क्षेत्राला अधिकार आहे.

**४१.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे दिनांक २४ जुलै, २००९ रोजी जे पत्र (क्र. एनजीसी २००८/२४३/२००८/विशि-१) पाठविण्यात आले त्यात स्पष्टपणे पुढील उल्लेख आहे. :-

"**(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसाच्या आंत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.**" हे तीस दिवस केंव्हाच संपले तरी निर्णय कां होत नाही हे जाणून घेण्याचा उच्च शिक्षण क्षेत्राला अधिकार आहे.

**४२.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे दिनांक ३१ जुलै, २००९ रोजी जे पत्र (क्र. एनजीसी (२००८/२४३/०८)/विशि-१) पाठविण्यात आले त्यात पुढीलप्रमाणे स्पष्ट उल्लेख आहे. :-

"**(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आंत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.**" हे तीस दिवस केंव्हा संपणार आहेत? अजून निर्णय कां होत नाही? हे जाणून घेण्याचा उच्च शिक्षण क्षेत्राला अधिकार आहे.

**४३.** नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २ मे, २०१२ रोजी एमफुक्टो या शिक्षक संघटनेसमवेत झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त व त्यात नमुद असलेले "विद्यापीठांनी विगर नेट-सेट अध्यापकांना नियमित नेमणूक देते वेळी दिलेल्या सुटीच्या दिनांकापासून सेवा नियमित करुन सदर सेवा नियमितीकरण हे सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरावयाचे असल्याचा निर्णय आयोगाने घेतला असल्याचा आयोगाच्या दि. १५ मार्च २०१२ च्या पत्राचा अन्वयार्थ स्पष्ट केला" त्यानंतर "**सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले.**" असा निर्णय झाला हे कोणीही अमान्य करत नाही. मात्र महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या समवेत झालेल्या चर्चेमध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या या आदेशाची आजपावेतो अंम्मलबजावणी का झालेली नाही याबावत मात्र कोणताही खुलासा झाला नाही.

**४४.** दिनांक ५ फेब्रुवारी २०१३ रोजी झालेल्या चर्चेमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री मा.श्री.अशोकराव चव्हाण यांच्याबाबत जे काही अनुदार उद्‌गार काढण्यात आले, त्यासंबधीचा सुद्धा स्पष्ट खुलासा होणे आवश्यक आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे स्वरुप स्पष्ट करणारा मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ८ सप्टेबर १९९४ रोजी सिव्हील अपिल नं. १८१९ ऑफ १९९४ मध्ये जो अंतिम निर्णय दिला आहे, त्याबाबतचे संघटनेचे म्हणजे तत्कालीन मा. मुख्यमंत्र्यांनी, मुख्य सचिवांनी व उच्च शिक्षणमंत्र्यांनी तपशीलवारपणे ऐकून घेतले होते. विधीसचिवांशी सुद्धा त्याबाबत सल्लामसलत केली होती. :- (1) Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8-9-1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ. : AIR 1995 SUPREME COURT 336 या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात पुढील महत्वाचा भाग समाविष्ट होता.:-

"**i) Regulations are valid :** Regulations (1991), notified on 19th September, 1991, by the University Grants Commission are valid.

**ii) recommendatory :** The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.

**iii) application prospective :** The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective."

**४५.** सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेटसेट बाबतच्या १९९१ च्या रेग्युलेशनचे तपशीलवार विश्लेषण करणारा जो निवाडा दिनांक ८.९.१९९४ रोजी दिला त्यानुसार हे रेग्युलेशन शिफारसींच्या स्वरुपाचे (The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.) आहे. ते सक्तीचे करावयाचे किंवा नाही याबाबतचा निर्णय विद्यापीठाने वा राज्य शासनाने घ्यावयाचा आहे. तसा निर्णय घेण्यात आल्यास तो परिनियम किंवा प्रमाणसंहिता निर्गमित केल्यानंतरच्या काळात (The second proviso to clause 2 makes the application of the said Regulations prospective.) लागू पडेल, पूर्वलक्षी प्रभावाने नव्हे. हे रेग्युलेशन उमेदवारासाठी (Relates to all applicants i.e. candidates) लागू आहेत, असे त्या निर्णयामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.

**४६.** सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयामुळे पुढे ४ एप्रिल, २००० चे रेग्युलेशन आयोगाला निर्गमित करावे लागले. त्यानुसार "कोणत्याही व्यक्तीला

**Accordingly, impugned order dated 21.8.2011 is hereby quashed. The State Government is directed to release the necessary fund for payment of arrears of salary of teachers**

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद १८ पहा)*

## या शिक्षकांना दोन भागात विभागून त्यांना वेगवेगळी वागणूक देण्याचे नोकरशाहीचे हे कारस्थान सपशेल घटनाविरोधी असून ते सहन करण्यास ठाम नकार

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ३२ पहा)*

(No person) नेटसेटची पात्रता परीक्षा उत्तीर्ण केल्याशिवाय विद्यापीठातून व महाविद्यालयातून शिक्षकीय पदावर नेमता येणार नाही" असे स्पष्टपणे नमूद करित असतांनाच विद्यापीठ अनुदान आयोगाला आपल्या या नियमाला एक परंतुक जोडावे लागले. यापूर्वीच नेमल्या गेलेल्या व्यक्तींच्या बाबतीत या परंतुकामध्ये असे ठामपणे नमूद करण्यात आलेले आहे की :- " Provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the candidates having had the then requisite minimum qualification as were existing at that time through duly constituted Selection Committees for making appointments to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations." यथोचितरित्या अस्तित्वात आलेल्या निवडसमितीच्या मार्फत ज्यांची निवड झालेली आहे व त्यावेळी अस्तित्वात असलेली किमान पात्रता जे धारण करतात त्यांना नेटसेटच्या पात्रतेचा नियम लागू असणार नाही, असे सन २००० च्या रेग्युलेशनमध्ये स्पष्टपणे नमूद आहे.

**४७.** दुसऱ्या बाजूला या हजारो शिक्षकांना सेवेतून काढून टाकण्याची तयारी तत्कालीन उच्च शिक्षण सचिव श्री. सहारिया यांनी केली होती पण विधी विभागाने "Not desirable" असा शेरा मारल्यामुळे त्यांच्या आनंदावर मोठेच विरजण पडले. तेव्हा त्यांनी या सर्व शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगातील कोणतीच वेतनश्रेणी (सर्वात खालची सुद्धा) द्यायची नाही असा निर्णय घेतला व त्याप्रमाणे १२ ऑगस्ट २००९ चा शासननिर्णय निर्गमितही झाला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील उपरोक्त भाग वाचल्यानंतर उच्च शिक्षण सचिवांची ही "चतुराई" तत्कालीन मा. मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आली होती. मंत्रालयातील मा. मुख्यमंत्र्यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये महासंघाचे कार्यकारी मंडळ, अनेक ज्येष्ठ अधिकारी, संबधीत मंत्री असे २५-३० लोक उपस्थित असलेल्या बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी उच्च शिक्षण सचिवांना उघडपणे व करड्या आवाजात पहिला प्रश्न विचारला.

"चौथ्या वेतन आयोगामध्ये या सर्व लोकांना तुम्ही (म्हणजे शासनाने) 'बॉटम स्केल' दिले होते की नाही?" त्यावर "होय" असे उत्तर आले. त्यानंतर तेवढ्याच करड्या आवाजात दुसरा प्रश्न मा. मुख्यमंत्र्यांनी विचारला.

**"पाचव्या वेतन आयोगामध्ये या सर्व लोकांना तुम्ही (म्हणजे शासनाने) 'बॉटम स्केल' दिले होते की नाही?"** त्यावर "होय" असे उत्तर पुन्हा आले. तितक्याच करड्या आवाजात मा. मुख्यमंत्र्यांनी आदेश दिला **"मग सहाव्या वेतन आयोगातील 'बॉटम स्केल' त्यांना द्यावे लागेल"** आणि त्यामुळेच मग उभयपक्षी स्वाक्षरित झालेल्या मतैक्य पत्रामध्ये परिच्छेद २ आला तो पुढील प्रमाणे :-

"(२) शासनाचे दि. १२ ऑगस्ट, २००९ चे निर्णयातील परिच्छेद 8 (E) (V) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी. :-

The revised pay scale shall be applicable only to those teachers who are covered in the above mentioned para 8 E (i) to (iv) and **non NET /SLET teachers approved by the University.** The latter will be placed in the lowest pay scale of the teachers (Assistant Professors). Similar amendment will be made in paragraph 12 (i)."

**४८.** तत्कालीन मा. मुख्यमंत्र्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २४ काळजीपूर्वक वाचलेला होता त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मान्यता मिळाली तरच या शिक्षकांना इतर सर्व लाभ मिळतील व यांच्या नेमणूका नियमित होतील हा उच्च शिक्षण सचिवांचा युक्तीवाद मा. मुख्यमंत्र्यांना योग्य वाटला. **"या शिक्षकांची भरती झाली तेव्हा नेटसेट सक्तीचे झालेलेच नव्हते व त्यानंतर ते पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही हे त्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातच आहे."** हा महासंघाचा युक्तीवाद प्रभावी होवू शकला नाही कारण उच्च शिक्षण सचिव पून्हा पून्हा या सर्व नेमणूकांच्या वेळी नेटसेट सक्तीचे होते असे गृहीत धरुन **"सुट देण्याचे अंतिम अधिकार हे विद्यापीठ अनुदान आयोगाचे आहेत"** असे प्रतिपादन करीत होते व त्यातूनच उच्च शिक्षण सचिवांचे ते वाक्य मतैक्य पत्रात आले ते पुढील प्रमाणे :-

"विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतुदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, **नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील."**

**४९.** महाराष्ट्रातून हे प्रकरण दिल्लीमध्ये गेल्यानंतर संघटनेच्या शिष्टमंडळाने तत्कालीन मानव संसाधन मंत्री श्री. कपिल सिब्बल यांची भेट घेतली. त्या भेटीच्या वेळी ज्येष्ठ संसद सदस्य श्री. वासुदेव आचार्य हे उपस्थित होते. नेटसेटची पात्रता पूर्वलक्षी प्रभावाने लागू केली जात आहे हे ऐकून कपिल सिब्बल यांना आश्चर्य वाटले व "असे करता येत नाही" असे स्पष्ट उद्‌गार त्यांनी काढले. नुसते उद्‌गार काढून ते थांबले नाहीत तर त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला तसे कळविण्याविषयी विभागाला आदेश दिले. केंद्र शासनाच्या Ministry of Human Resource Development Department of Higher Education या विभागाच्या "D.O.No. B-7/2010-U.I Dated the 3rd November, 2010" अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाला एक पत्र पाठवून "these regulations are bound to be prospective only. Appointments can never be made with retrospective dates." असे कळविले.

**५०.** ८ सप्टेबर १९९४ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २४ चा विद्यापीठ अनुदान आयोगाने नुसता विचार केला असे नव्हे तर एका बाजूला सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत एका मागून एक दिलेले अनेक निर्णय, दुसऱ्या बाजूला खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाचे "सेवा नेमणूकीच्या दिवसापासूनच

## नोकरशाहीने पहिल्या दिवसापासून सेवा धरुन लाभ देतो म्हटले तर त्यांना कोणत्याही नव्या शासन आदेशाची किंवा मंत्रिमंडळाच्या निर्णयाची गरज नसते. मात्र मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी किंवा मा. मुख्यमंत्र्यांनी तसाच लाभ देतो म्हटले की अनेक प्रकारचे अडथळे नोकरशाहीकडून उभे केले जातात

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ३३ पहा)*

धरण्यात येईल" असे अनेक वर्षापासून अस्तित्वात असलेले नियम, तिसऱ्या बाजूला खुद्द केंद्र शासनाने दिनांक ३ नोव्हेंबर २०१० च्या पत्रान्वये स्पष्टपणे दिलेले आदेश यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने ८ जुलै २०११ रोजीच्या आयोगाच्या बैठकीत फक्त एकट्या महाराष्ट्रासाठी जो निर्णय घेतला त्या निर्णयात असे म्हटले आहे की :-

"The Commission **deliberated** on the issue regarding appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19,1991 until April 3,2000 and resolved that all such appointments made on regular basis by various universities in the state of Maharashtra where the **university has granted exemption** to teachers from the requirement of NET in terms of the UGC Regulations, 1991 and subsequent Notification dated 24.12.1998 and where the **representation** has been forwarded to Commission seeking further approval in relation to such regular appointments made during the said period w.e.f. September 19,1991 till April 3, 2000 **is approved.** It further resolved that a communication in this regard be sent to the universities concerned and the state of Maharashtra" हा निर्णय महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण खात्याच्या मा. प्रधान सचिवांना १६ ऑगस्ट २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र पाठवून कळविला. त्याची प्रत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला सुद्धा देण्यात आली होती.

**५१.** पुन्हा विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २६ ऑगस्ट २०११ रोजी एक पत्र पाठवून पूर्व परिच्छेदात नमुद केलेला निर्णय तर कळविलाच व त्याचबरोबर आणखी असेही कळविले की, "As may be seen from the above decision of the commission, the commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 19, 1991 to April 3, 2000. Therefore the services of such teachers **for all purposes should be counted from the date of their regular appointment.**"

**५२.** विद्यापीठ अनुदान आयोगाने सरसकट व धोरणात्मक निर्णय घेतल्यामुळे एकएक प्रकरण हाताळण्याची आपली संधी संपुष्टात आली यामुळे कातावलेल्या उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने (मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या लेखी सूचनेच्या विरोधात) दि. २ डिसेंबर २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांना नेट-सेट ग्रस्त प्राध्यापकांच्या बाबत एक पत्र देऊन यु.जी.सी. ने महाराष्ट्रातील नेट-सेट ग्रस्त प्राध्यापकांबद्दल कायदे व नियमांना धरुन घेतलेल्या सकारात्मक आणि धोरणात्मक निर्णयाविरुद्ध खूपच मोठी आगपाखड केली होती. उच्च शिक्षण विभागाने पाठविलेल्या पत्रात "Therefore it is very absurd on the part of UGC..." असा उल्लेख करुन या नोकरशहांनी आपल्या मर्यादांचे उल्लंघन केले होते. "absurd" या शब्दाचा शब्दकोपात असलेला मराठीतील अर्थ "मुर्खपणा, असमंजस, अयोग्य, हास्यास्पद" असा होतो. यु.जी.सी.ला "मुर्ख, असमंजस, हास्यास्पद" ठरविणाऱ्या व ते देखील लेखी स्वरुपात कळविणाऱ्या महाराष्ट्राच्या उच्चशिक्षण विभागाच्या नोकरशाहीला विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १५ मार्च २०१२ रोजी जे उत्तर (By Speed Post : No. F-13/2011(PS) ) पाठविले, त्या पत्राचा विषयच "**Subject :** Unwarranted request from Principal Secretary, Higher Education, Government of Maharashtra to the UGC for reverting the decision on grant of exemption and regularization services of non NET/SET teachers in Maharashtra appointed during 19.09.1991 till 03.04.2000." असा होता व त्यात " With reference to your letter No. Nil dated 13th February, 2012 on the subject cited above, I am directed to inform you that the actual date of effect for grant of exemption to a particular candidates shall be the date of exemption actually granted by the universities to the concerned candidate appointed on Regular Basis" असे स्पष्टपणे नमुद केलेले होते.

**५३.** आजच्या मा. मुख्यमंत्र्यांनी विद्यमान शिक्षण सचिवांना हे विचारले पाहिजे की

"विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतूदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, **नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील" असे आपण लेखी लिहून दिल्यावर व आता अंतिम निर्णय आल्यावर तुमची नक्की अडचण काय आहे?**

आणखी हेही विचारले पाहिजे की, "**सदर बाब अशीच स्विकृत करावयाचे ठरले.**" असे मा. मुख्यमंत्र्यांनी आदेशित केले असतांना सहसंचालक जी गोष्ट करु शकतात ती विभागाने न करण्याचे कारण काय?

**५४.** एक्झ्मशन या शब्दाचा अर्थ सांगण्याची पाळी महाराष्ट्रातील प्राध्यापकांवर यावी ही मोठीच दुर्दैवाची गोष्ट होय. "**EXEMPT, EXEMPTED, EXEMPTION**" या शब्दांचा अर्थ **महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयातर्फे प्रसिद्ध झालेल्या** (मुळ आवृत्ती, मे, १९७३ पृष्ठ २१०) **शासन व्यवहार कोशामध्ये नमुद केलेला आहे.** (1) Exempt या शब्दाचा अर्थ सुट देणे, माफी देणे, माफ करणे (2) Exempted या शब्दाचा अर्थ सुट मिळालेले, माफी मिळालेले व (3) Exemption या शब्दाचा अर्थ सुट, माफी असा नमुद आहे.

निवड समितीमार्फत निवड झालेल्या या प्रत्येक शिक्षकाला नेटसेट पात्रतेपासून सूट देवून त्या शिक्षकाच्या नेमणूकीला मान्यता देण्यात आली. त्यानंतर मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ही सर्व प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली. राज्य शासनानेसुद्धा हा अंतिम अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाचा आहे असे सांगून ती सर्व प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविली. आता १९९१ ते २००० या काळातील सर्व नेटसेट मुक्त शिक्षकांच्या नेमणूकीला मान्यता देणारा एकसारखा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतला असतांना त्यातील निम्म्यापेक्षा जास्त शिक्षकांना विभागीय सहसंचालक अस्तित्वातील शासननिर्णयांचा वापर करुन वेतननिश्चिती व स्थाननिश्चिती देवू शकतात मात्र राज्याचे उच्च शिक्षणमंत्री व राज्याचे मुख्य सचिव "विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतूदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, **नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील**" असे लेखी स्वरुपात लिहून देतात पण त्यावर कोणतीच कारवाई होत नाही यातून निर्माण होणारे चित्र महाराष्ट्रातील प्राध्यापकांना विचित्र वाटल्यात कोणतेही नवल नाही.

**५५.** याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने एक्झ्मशन बाबत एकदा आपल्या ११ मे २०१२ च्या पत्रान्वये राज्य शासनाला "The factual position on the subject is given as under :- **The actual date of grant of exemption** shall be the date when exemption was granted by the universities to the candidates concerned appointed on regular basis during the period w.e.f. 19.9.1991 to 03.04.2000. " असे कळविल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे त्या शिक्षकांच्या सेवा संपूर्णपणे नियमित होतात. Civil Appeal No. 1819 of 1994, decided on 8-9-1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. (A.M. AHMADI AND S.P.

***वित्त विभागाची मान्यता होऊन, मंत्रिमंडळाची मान्यता मिळून, शासननिर्णय निघाल्यावरसुद्धा ते लाभ शिक्षकांच्या पदरात पडू न देण्यामध्ये उच्च शिक्षण विभागातील नोकरशाही अत्यंत वाकबगार आहे.***

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजीच्या बैठकीत सम्मत झालेल्या ठरावातील परिच्छेद ३३ पहा)*

BHARUCHA, JJ.) : AIR 1995 SUPREME COURT 336 या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २४ पूढील प्रमाणे आहे.:-

" 24.... As analyzed above, therefore the Delhi University may appoint as a lecturer in itself and its affiliated colleges one who has cleared the test prescribed by the said Regulations or it may seek prior approval for the relaxation of this requirement in a specific case; or it may appoint as lecturer one who does not meet this requirement without having first obtained the UGC's approval, in which event it would if it failed to show cause for it's failure to abide by the said Regulations to the satisfaction of the UGC, forfeit its grant from the U.G.C. If however it did show cause to the satisfaction of the U.G.C., **it not only would not forfeit its grant but the appointment made without obtaining the U.G.C's prior approval would stand regularized."** थोडक्यात सांगावयाचे तर विद्यापीठ अनुदान आयोगाची नेट-सेट मुक्ततेबाबत एकदा मान्यता मिळाली की या शिक्षकांच्या सेवा तर नियमित होतीलच पण **त्यांच्या वेतनाबरील केंद्राचे किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुज्ञेय अनुदान सुद्धा त्यांना मिळेल असा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. सन १९९१ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनचे स्वरुप स्पष्ट करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सर्व बाजूंनी जोरदार युक्तीवाद झालेत व त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने देशभरासाठी १९९१ च्या रेग्युलेशनचे स्वरुप निश्चित करुन दिले व भारतात आज हा या विषयावरील कायद्याचा अर्थ सांगणारा अंतिम शब्द आहे.** शब्दशः पुढील प्रमाणे :- "..... it not only would not forfeit its grant but the appointment made **without obtaining the U.G.C's prior approval would stand regularized.**"

५६. **"महाराष्ट्राच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी राज्याच्या मुख्यसचिवांच्या उपस्थितीत दिलेल्या लिखित आश्वासनाचे पालन केले जात नाही, त्यांनी राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत दिलेल्या लिखित शब्दांची अंमलबजावणी केली जात नाही, यामुळे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे.** सचिवालयांत उच्च शिक्षण विभागामध्ये काम करणाऱ्या मध्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांनी मंत्रिमहोदयांची फजिती व्हावी म्हणून योजिलेल्या अनेक कारस्थानातून ही स्थिती निर्माण झालेली आहे. याचे भरपूर पुरावे महासंघाजवळ आहेत" ही बाब या महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक १६ सप्टेंबर २०१२ रोजी सम्मत केलेल्या आंदोलनाच्या ठरावाच्या पहिल्याच परिच्छेदात नमुद केलेली आहे व तो ठराव शासनाला सादर करण्यात आला आहे. त्याच ठरावात पुढे असेही नमुद करण्यात आले आहे की, "उपरोक्त नोकरशाहीने उच्च शिक्षणामध्ये जो धुडगूस घातला त्याचे थोडक्यात वर्णन करावयाचे झाल्यास विद्यापीठ कायदा, विद्यापीठांचे परिनियम, अस्तित्वात असलेले कायदे, मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय, विद्यापीठ अनुदान आयोगाचे निदेश व निर्णय, केंद्र शासनाचे निदेश, प्राध्यापक महासंघ व राज्यशासन यांच्यात स्वाक्षरीत झालेले मतैक्यपत्र या सर्वांच्या विरोधात जावून **उच्च शिक्षण विभागातील नोकरशाहीने सन १९९१ ते २००० या काळातील नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत एकामागून एक जवळ जवळ डझनभर बेकायदेशीर आदेश काढलेत. हे आदेश संपूर्णपणे बेकायदेशीर असल्यामुळे त्यातील प्रत्येक आदेश अत्यंत नामुष्की होवून शासनाला परत घ्यावा लागला.** त्या त्या वेळी उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये जो असंतोष निर्माण झाला, जी आंदोलने झाली त्यातून निर्माण झालेल्या अशांततेच्या पोटी उच्च शिक्षण क्षेत्राचे जे नुकसान झाले त्याची तर मोजदादसुद्धा करता येणार नाही. महाराष्ट्र राज्याच्या नुकत्याच संपलेल्या सूवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त निर्गमित केलेले आदेश एकामागून एक मागे घ्यावे लागण्याच्या नामुष्कीची स्पर्धा आयोजित केली आणि अशा स्पर्धेसाठी कोणालाही 'रेफरी' नेमले तरी उच्च शिक्षण विभागालाच पहिले बक्षीस मिळेल याविषयी शंका असण्याचे कोणतेही कारण नाही."

५७. नोकरशाहीने मांडलेल्या छळवादाचा जुना अनुभव लक्षात घेता व झालेल्या चर्चेचा तपशील संपूर्णपणे लक्षात घेताः-

(१) केंद्राकडून परतावा मिळणारी ८० टक्के थकबाकीची रक्कम शासनाने पुढील एक महिन्यामध्ये एकमुस्त अदा करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

(२) मा. उच्च शिक्षणमंत्री व मुख्यसचिव यांनी वारंवार ठरवून दिलेल्या मुदतीत नेटसेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत वचनपूर्तीची कार्यवाही झाली नाही. मा. मुख्यमंत्र्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अंतिम निर्णयाबाबत दिलेल्या आदेशांचे पालन झाले नाही. ते तातडीने व्हावे व सर्वात महत्वाचे म्हणजे मा. सर्वोच्च न्यायालयाने सेवेच्या नियमितीकरणाबाबत दिलेल्या निर्णयाचे पालन करणारे आदेश तत्परतेने निर्गमित करावे अशी मागणी करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने यापूर्वीच सादर केलेल्या मागणीपत्रातील इतर मागण्यांबाबत चर्चा होवून निर्णय घेण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे.

**दिनांक ५ व ६ फेब्रुवारी २०१३ रोजीची चर्चा अत्यंत एकतर्फी व असमाधानकारक झाल्याने व त्यातून काहीही निष्पन्न न झाल्याने आंदोलन ठामपणे व निर्धारपूर्वक पुढे चालविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.** अशावेळी तिथल्यातिथे अशा बैठकीचे कार्यवृत्त तयार करुन देण्याची यापूर्वी पद्धत होती पण या बैठकीचे कोणतेही लेखी कार्यवृत्त आज संघटनेला प्राप्त झालेले नाही. असे कार्यवृत्त प्राप्त झाल्यास त्याबाबतचे या संघटनेचे मत त्यानंतरच नमुद करता येईल.

**(प्रा. शिवाजीराव पाटील)** — *अध्यक्ष*

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

******

## *महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या ठरावानुसार सुरु असलेल्या आंदोलनाची सद्यस्थिती*

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत सम्मत झालेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार सुरु असलेल्या आंदोलनाची सद्यस्थिती, मा. मुख्यमंत्र्यासमवेत झालेल्या बैठकीबाबत माहिती देण्याकरीता नागपूर व अमरावती येथील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मेळाव्याचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्या प्रमाणे आहे. सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. अनिल ढगे, सचिव, नुटा**

### तक्ता

## *नागपूर व अमरावती येथे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मेळाव्यांचे आयोजन*

| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | बीझनेस मॅनेजमेंट सभागृह, सी.पी. अँन्ड बेरार कॉलेज, सी.पी. क्लब समोर, रवी नगर, नागपूर | रविवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१३ | सकाळी १०.३० वाजता |
| संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. | केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती | शनिवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३ | दुपारी ४.०० वाजता |

*दिनांक ६.२.२०१३ रोजी झालेल्या बैठकीचे शासनातर्फे तयार करण्यात आलेले एकतर्फी शासकीय कार्यवृत्त*

# उच्च व तंत्रशिक्षण विभाग/विशि-१

## मा. मुख्यमंत्री यांच्या कडे दि. ६.२.२०१३ रोजी एमफुक्टो या शिक्षकसंघटनेसमवेत झालेल्या बैठकीचे कार्यवृत..

सदर बैठकीत खालील मा. मंत्री/अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते :-

(१) मा. उपमुख्यमंत्री

(२) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण)

(३) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण)

(४) अप्पर मुख्य सचिव, (उच्च व तंत्र शिक्षण)

(५) डॉ. पी. आर. गायकवाड, संचालक, उच्च शिक्षण

(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स

(७) प्रा. बी. टी देशमुख, माजी वि.प.स.

(८) प्रा. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष, एम फुक्टो

(९) श्रीमती तापती मुखोपाध्याय, महासचिव, एम फुक्टो

(१०) एम फुक्टो संघटनेचे इतर पदाधिकारी.

२. मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री (वित्त) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व शिक्षक संघटनेचे पदाधिकारी यांच्यामध्ये सविस्तर चर्चा होवुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.-

(१) (i) राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित शासकीय व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना सहाव्या वेतन आयोगानुसार लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेनुसार दिनांक १.१.२००६ ते दिनांक ३१.३.२०१० या कालावधीतील वेतन फरकाच्या थकबाकीची केंद्र शासनाच्या हिश्याची (८० टक्के) रुपये १५२६.५० कोटी इतकी रक्कम अनुज्ञेय आहे.

(ii) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या दि. ३१.१२.२००८ च्या आदेशामध्ये उक्त ८० टक्के रक्कम केंद्रीय अर्थसहाय्य म्हणून राज्य शासनास देण्यात येईल असे स्पष्ट केले होते. **तथापि, दि. १४.०८.२०१२ च्या पत्रान्वये मात्र वरील ८० टक्के रक्कम प्रथम राज्य शासनाने अदा करावी. त्यानंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती २ ते ३ हप्त्यामध्ये राज्य शासनास करण्यात येईल असे कळविले आहे.** सदर २ ते ३ हप्त्यातील रक्कम किती कालावधीत राज्य शासनास अदा करण्यात येईल, त्याबाबत केंद्र शासनाच्या पत्रात कोणतेही भाष्य केले नाही. **तसेच केंद्र शासनाने दि. १४.११.२०१२ च्या पत्रान्वये संबंधित अध्यापकांना केंद्र शासनाच्या ८० टक्के हिस्स्याची रक्कम अदा केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले आहे.**

(iii) केंद्र शासनाचे वरील धोरण विचारात घेता सदर रु. १५२६.५० कोटी इतक्या रक्कमेपैकी रुपये ५००.०० कोटी इतक्या रक्कमेचा पहिला हप्ता मार्च, २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरीत करण्यात येईल.

(iv) तदनंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व **केंद्र शासनाकडून जेवढ्या रक्कमेची प्रतिपुर्ती होईल, तेवढी रक्कम राज्य शासनाकडून दुसरा हप्ता देण्यासाठी आगामी अधिवेशनात तरतुद करून सदर रक्कम वितरीत करण्यात येईल.**

(v) त्याचप्रमाणे राज्य शासनाने अदा केलेल्या दुसऱ्या हप्त्याची प्रतिपूर्ती करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व **केंद्र शासनाकडून जेवढ्या रक्कमेची प्रतिपूर्ती होईल तेवढी रक्कम राज्य शासनाकडून तिसरा हप्ता देण्यासाठी आगामी अधिवेशनात तरतुद करून सदर रक्कम वितरीत करण्यात येईल.**

(vi) वरील पद्धतीने थकबाकीची रु. १५२६.५० कोटी इतकी रक्कम अध्यापकांना अदा करण्यात येईल.

(vii) केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या प्रतिपूर्ती संदर्भात आवश्यक असलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

(२) राज्यातील दि. १९.९.१९९१ ते दि. ३.४.२००० या कालावधीतील नियुक्त झालेल्या बिगर नेटसेट अध्यापकांच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय यांनी विविध याचिकांच्या अनुषंगाने वेळोवेळी दिलेले निर्णय, मंत्रिमंडळाने यापूर्वी घेतलेले निर्णय, विद्यापीठ अनुदान आयोगाने तसेच केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व पत्रांचा विचार करून सदर अध्यापकांच्या सेवा कोणत्या दिनांकापासून, कोणत्या कारणास्तव ग्राह्य धरण्यात याव्यात तसेच या अनुषंगाने त्यांची करावयाची स्थाननिश्चिती, वेतननिश्चिती, थकबाकी इत्यादी संदर्भात मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव माहे मार्च २०१३ अखेरपर्यंत सादर करण्यात येईल.

(३) वरील निर्णय विचारात घेऊन राज्यातील विद्यार्थी, पालक व शिक्षकांची सामाजिक जबाबदारीची जाणिव लक्षात घेऊन परीक्षा संदर्भातील सर्व कामकाजावर घातलेला बहिष्कार व त्या अनुषंगाने सुरू असलेले आंदोलन तात्काळ मागे घेण्याची विनंती मा. मुख्यमंत्री यांनी शिक्षक संघटनेस केली.

उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

** FS : P 15 **

*महाराष्ट्र शासन : बैठक : २०१३/(३८/१३) विशि-१*
*उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२*
**दिनांक : ९ फेब्रुवारी, २०१३.**

प्रति,
श्री. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष, एमफुक्टो,
शिवाई, ३९ रेऊ नगर, ढेकू रोड, अमळनेर, जि. जळगांव
पिन कोड : ४२५ ४०१
श्री. विक्रम काळे, विधान परिषद सदस्य
श्री. बी. टी. देशमुख, माजी विधान परिषद सदस्य

**विषय :** एमफुक्टो संघटनेच्या विविध मागण्यांबाबत मा. मुख्यमंत्री यांच्याकडे झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त.

महोदय,

मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी एमफुक्टो या शिक्षक संघटनेची बैठक झाली. सदर बैठकीचे कार्यवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

आपला,
**(विकास तु. कदम)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- (१) मा. राज्यपाल यांचे उपसचिव, राजभवन, मलबार हील, मुंबई (२) संचालक, उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, (३) मा. मुख्यमंत्री यांचे खासगी सचिव, (४) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (५) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, (६) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, (७) प्रधान सचिव, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, (८) प्रधान सचिव, (वित्त) यांचे स्वीय सहायक, (९) सहसचिव (मशि) यांचे स्वीय सहायक, (१०) सहसचिव (विशि) यांचे स्वीय सहायक, (११) निवड नस्ती.

** FS : P11 **

***दिनांक ५ व ६ फेब्रुवारी २०१३ रोजीची चर्चा अत्यंत एकतर्फी व असमाधानकारक झाल्याने व त्यातून काहीही निष्पन्न न झाल्याने आंदोलन ठामपणे व निर्धारपूर्वक पुढे चालविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.***

*(परिच्छेद ५७ पहा)*

# COURT NO. - 9

## Case :- WRIT - A No. - 64068 of 2011

**Petitioner :-** Dr. Hridaya Nath Tripathi **Respondent :-** The State Of U.P. And Others

**Petitioner Counsel :-** Durga Tiwari : **Respondent Counsel :-** C.S.C.,B.D.Pandey

## Hon'ble Rajiv Sharma,J.

## Hon'ble Satyendra Singh Chauhan,J.

## Order Date :- 17.1.2013

Heard learned counsel for the petitioner and learned Standing Counsel as well as learned counsel for the Union of India.

The petitioner, who is a Coordinator of the Association, known as U.P. University College Professors Association and Ex-Reader in Agriculture Engineering Department at National P.G. College, Barhalganj, District Gorakhpur, has filed the instant writ petition on account of non-payment of arrears of salary to the members of Association w.e.f. 1.1.2006 to 30.11.2008 pursuant to the recommendations 6th Pay Commission.

According to the petitioner, the University Grants Commission has been established under the provisions of University Grants Commission Act, 1956, which is a Central Act. The recommendations of the University Grants Commission are binding on all the State Universities. The University Grants Commission has made a recommendation for the pay scales of Teachers throughout the Country which was accepted and implemented by the Ministry of Human Resource Department vide Circular dated 31.12.2008. **The State Government, vide order dated 28.2.2009, has also accepted/adopted the pay scale of Teachers as recommended by the University Grants Commission and implemented by the Ministry of Human Resource Department** with certain conditions. A plain reading of the Government Order dated 28.2.2009 makes it clear that the pay scale of Teachers, Principals and Librarians has been allowed under the said Government Order in terms of the recommendations of the University Grants Commission and the Central Government to the Teachers, Principals and Librarians of the State Universities and Colleges (Government as well as aided non-Government).

According to the petitioner, the Scheme of revision of pay-scale and other service conditions of teacher, which were made applicable for the teachers of Central Universities, was adopted by the State Government. Thereafter, the Director of Higher Education, U.P., Allahabad issued a letter dated 25.11.2010 to all the Regional Higher Education Officers for submitting the report with regard to the payment of arrears of salary for the period of 1.1.2006 to 30.3.2010. On receipt of the said letter dated 25.11.2010, the Principal of National Post Graduate College, Barhalganj, Gorakhpur has sent a letter on 1.2.2011 to the Regional Higher Education Officer, Gorakhpur, demanding the fund for the payment of arrears from the State Government for the period 1.1.2006 to 3.10.2008 but no decision in respect thereof was made by the State Government and as such, the petitioner preferred representation, which too was not decided. In these backdrop of the aforesaid facts, the petitioner approached this Court **by filing a writ petition No. 20375 of 2011. A Co-ordinate Bench of this Court, vide order dated 7.4.2011, disposed of the writ petition with a direction to the respondent No.1 to decide the representation of the petitioner with regard to the payment of arrears of salary.**

As the aforeasaid order dated 7.4.2011 passed by this Court was not complied in its letter and spirit and as such, the petitioner preferred a **contempt petition,** bearing No. 3226 of 2011, in which, notice was issued.

According to the petitioner, **after issuing notice by the Contempt Court, the respondent No.1 decided the petitioner's representation in compliance of the order dated 7.4.2011, whereby the respondent No.1 rejected the petitioner's representation.**

Hence the instant writ petition.

Learned Counsel for the petitioner has submitted that though the State Government had accepted the revision of pay-scale in pursuant to the Scheme dated 31.12.2008 and also issued a Government Order dated 28.2.2009 to this effect but the respondent No.1, **without considering the Government Orders, rejected the petitioner's representation in a cursory manner.**

Elaborating his submission, learned Counsel for the petitioner submits that the Scheme of the Central Government for the payment of revision of pay scale, which was accepted by the State Government vide order dated 28.2.2009, is reimbursive in nature and the purpose of reimbursement is that the State Government will pay first and thereafter the State Government will get the money from the Central Government. He submits that the sole ground for nonpayment of the revision of pay-scale to the petitioner is that the Central Government has not provided 80% budget. **He submits that while rejecting the petitioner's representation, the respondent No.1 has not stated a whisper of word about the reimbursement.** Furthermore, the State Government has already obtained the budget of Rs. 780.00 Crore for the Financial Year 2011-2012 and 800 Crore in the financial year 2010-2011 for the payment of revision of pay-scale to the teachers of the higher education and the same was also accepted by the respondent 1 in the impugned order. Thus, the impugned order is liable to be rejected.

**Supporting the action of the State Government, learned Standing Counsel submits that for payment of arrears from 1.1.2006 to 30.11.2008, the State Government adopted the scheme of revised pay-scale, *inter alia,* on the assurance that 80% of the expenses to be incurred in the implementation of the scheme would be borne by the Central Government.** Accordingly, the State Government has demanded 80% of the money under the Scheme from the Central Government vide letters dated 16.6.2010 and 1.8.2011 but not a single penny has been sent by the Central Government. Therefore, the revised pay-scale to the teachers of the Universities could not be paid. Furthermore, vide impugned order dated 21.8.2011, it has been explained that after receipt of assistance from the Central Government, arrears will be paid. Thus, the respondent No.1, after considering the entire aspect of the matter, has rightly rejected the petitioner's representation.

**Mr. Ajai Ballabh, learned counsel for the Union of India states** that after taking into consideration the views expressed by the several State Education Ministers during the Conference held in the year 2010, the Central Government decided to delink the condition of enhancement of age of superannuation from the payment of Central share of 80% arrears to the States. Accordingly, vide letter No. F-1- 7/2010-U,II dated 14.8.2012 issued to all the State Education Secretaries in charge of Higher Education, the Ministry of Human Resource Development Department of Higher Education informed that the issue of age of retirement has been left to the State Government to decide at their level and the condition of enhancement of age of superannuation to 65 years as mentioned in the Ministry's letter dated 31.12.2008 may be treated as withdrawn for the purpose of seeking reimbursement of central share of arrears to be paid to the State University and College teachers. **It was also clarified vide letter dated 14.8.2012 that reimbursement of 80% of central share of the additional payment of arrears for the period 1.1.2006 to 31.3.2010 will be made by the Central Government in 2-3 installments, h**owever, this would be by way of reimbursement only, after the State Government has made the payment. Thus, as per the provisions of the Scheme, the State Government has to pay the revision of pay-scale to the employees under the Scheme and it is only thereafter on demand made by the State Government from the Central Government, 80% of the amount would be reimbursed by the Central Government and as such, it is the duty of the State Government to pay the amount to its employees.

It is not in dispute that the said Scheme was essentially for teachers in Central Universities and the provisions of the Scheme could be made applicable by the State Government to State Universities and Colleges coming under the purview of the State Government, provided the State Governments adopted and implemented the scheme as a composite scheme and the regulations laid down by the University Grants Commission in this regard. **For implementation of the said scheme, the Central Government had decided to provide financial assistance for the period 1.1.2006 to 31.3.2010 to the extent of 80% as reimbursement to those State Governments,** who may opt for these revised pay-scales. Furthermore, the State Governments were to provide 20% of the arrears from its own resources. The said assistance was subject to the condition that the entire pay revision package together with all conditions laid down in this regard by the University Grants Commission by way of regulations, would be implemented as a composite scheme by the State Governments without any modification except to the date of implementation ( on or after 1.1.2006) and any higher scales of pay which the State Governments may decide after taking into consideration local conditions into consideration. However, the assistance from the Central Government would be limited to the scales of pay as approved by the Central Government under the Scheme.

**It is also not in dispute that the State Government had accepted the terms and conditions of the Scheme and as such, we are of the view that once the scheme has been accepted by the State Government, it is the bounden duty of the State to act thereupon.** In the instant case, on perusal of the letter dated 14.8.2012, which has been produced before us during the course of arguments by the learned Counsel for the Union of India, it transpires that the Central Government has made it clear that reimbursement of 80% of Central share of the additionality of payment of arrears for the period from 1.1.2006 to 31.3.2010 would be made by the Central Government in 2-3 installments by way of reimbursement only after the State Government had made the payment but the State Government has not paid the entire amount of revised pay-scale to the eligible teachers on the pretext that after receiving 80% share from the Central Government, the revised pay-scale would be paid to the eligible teachers, which vitiates the dictum of the scheme so formulated for paying revised pay-scale in pursuant to the VI Pay Commission's Report. Once it is clearly mentioned in the said scheme that after paying the revised pay-scale to the eligible teachers make a request to this effect will be made by the State Government and the Central Government would there after reimburse the same.

**In view of the aforesaid facts, we are of the view that the stand taken by the State Government in the impugned order is wholly erroneous and cannot be sustained. The proper course available to the State Government is first to pay the amount pursuant to the recommendations of the UGC, which admittedly has been accepted by the State Government and thereafter shall apply to the Central Government for reimbursement of the amount** so incurred towards the payment of arrears of salary. For the reasons aforesaid, the impugned order dated 21.8.2011 is liable to be quashed.

**Accordingly, impugned order dated 21.8.2011 is hereby quashed. The State Government is directed to release the necessary fund for payment of arrears of salary of teachers of National Post Graduate College, Barhalganj, Gorakhpur within a maximum period of one month, from the date of receipt of certified copy of this order.** Before parting, we would like to observe that if any request for reimbursement of the amount is made by the State Government, then the Central Government will release the necessary funds as per the provisions of scheme as has been assured by the Counsel for the Union of India within a period of three months thereafter.

The writ petition stands allowed in above terms.

**Order Date :-** 17.1.2013

******

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **15.02.2013**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

To,.............................................................................

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................